रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ५६
www.ramprahar.com

शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

राज्यात ५९ मोबाईल फॉरेन्सिक लॅब कार्यान्वित/२

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेला रिझर्व्ह बँकेने ठोठावला दंड/५

वुशू स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश/८

## श्रीवर्धन किनाऱ्यावर तब्बल ६० लाखांचे चरस जप्त



**श्रीवर्धन :** दिघी सागरी पोलीस ठाणे हद्दीत मोठी कारवाई करत अमली पदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. गुरुवारी मणेरी नानवली गावच्या हद्दीतील समुद्रकिनारी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गैरकायद्याने विक्री करण्याच्या उद्देशाने टाकून दिलेला ११ किलो ९६६ ग्रॅम वजनाचा 'चरस' हा अमली पदार्थ पोलिसांच्या हाती लागला. या अमली पदार्थांची बाजारमूल्ये तब्बल ५९ लाख ८३ हजार रुपये इतकी असल्याचे समजते. प्राथमिक चौकशीत हा चरस परदेशातून समुद्रमार्गे आणून किनाऱ्यावर टाकण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून, या मागील टोळी व संबंधित आरोपींचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत. तपास सपोनि हनुमंत शिंदे हे करीत आहेत.

# रायगड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करा

आमदार प्रशांत ठाकूर यांची सूचना

जिल्हाधिकाऱ्यांना विविध विषयांसंदर्भात निवेदन सादर

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकार पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी आणि नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा पाणी व स्वच्छता समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची आढावा बैठक शुक्रवारी (दि.१२) अलिबागमध्ये झाली. यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी चर्चेत भाग घेऊन योजना पूर्ण होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. योजना बांधून पूर्ण झाल्या तरी त्यातून पाणीपूरवठा होणे महत्वाचे आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.



या बैठकीला राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, जिल्हा पाणी व स्वच्छता समितीचे अध्यक्ष तथा रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक मोरे यांच्यासह पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले की, यांनी ग्रामीण भागातील नागरिकांना येणाऱ्या अडचणींचा उल्लेख करून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे विविध विषयांसंदर्भातील निवेदन सादर केले. तर आमदार रविशेठ पाटील यांनीही विविध सूचना केल्या.

जलजीवन मिशनची कामे अपूर्ण असल्याबद्दल खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. योजना अपूर्ण का आहेत याची तालुकावार माहिती घेण्यसाठी एक बैठक आयोजित करावी. ज्या योजनांची कामे अपूर्ण आहेत त्या योजना तातडीने पूर्ण कराव्यात, अशा सूचना खासदार धैर्यशील पाटील यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना केल्या.

जलजीवन मिशन योजनेद्वारे पाणीपुरवठा योजन राबविण्यात येत आहे. या योजनेतून रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांबाबत अनेक तक्रारी आहेत. **(पान २ वर..)**

# राज्यातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर

■ सर्वसाधारण प्रवर्गासाठी रायगड राखीव

**अलिबाग : प्रतिनिधी**


स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापतींचे आरक्षण जाहीर झाले आहे. ग्रामविकास विभागाकडून अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. ३४ जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठीचे आरक्षण घोषित करण्यात आले आहे. यानुसार रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झाले. त्यामुळे रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठी चुरस निर्माण होणार आहे.

जिल्हा परिषदेसाठी यापुर्वी सन २०१७ मध्ये निवडणूक झाली होती. त्यावेळी सुरवातीला अडीच वर्ष अध्यक्षपद इतर मागास प्रवर्गासाठी तर नंतरची अडीच वर्ष अनुसुचित जमाती महिला प्रवर्गासाठी राखिव होते. त्यामुळे या वेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद कोणासाठी राखीव होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागून होते. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण घटकासाठी आरक्षित झाले आहे. दरम्यान, बदलत्या राजकीय समिकरणांचा परिणाम आगामी निवडणुकांमध्येही पहायला मिळतील.

### असे आहे आरक्षण

रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर ठाणे, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. सोलापूर, हिंगोली, नागपूर, भंडारा या ठिकाणी पुरुष मागस प्रवर्गासाठी आरक्षण तर रत्नागिरी, धुळे, सातारा, जालना, नांदेड या ठिकाणी महिला मागस प्रवर्गासाठी आरक्षण असणार आहे.

## सी.पी. राधाकृष्णन यांनी घेतली उपराष्ट्रपतीपदाची शपथ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना शुक्रवारी (दि.१२) राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची शपथ दिली.

या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, अनेक केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानसभाचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

## ७५ एसटी बसस्थानकांवर होणार मोफत वाचनालय सुरू

पंतप्रधान मोदींच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त एसटीच्या प्रमुख ७५ बसस्थानकावर सर्वसामान्य लोकांसाठी मोफत वाचनालय सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ही पुस्तके लोक आपल्या घरी वाचनास घेऊन जाऊ शकतात व वाचन करून परत आणून देऊ शकतात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीदेखील या फिरत्या वाचनालयामध्ये उपलब्ध करून दिले जातील. स्थानिक वृत्तपत्रेदेखील दररोजच्या दररोज उपलब्ध करून दिली जातील.

## पोलीस भरतीसाठी वयोमर्यादेत महाराष्ट्र सरकारची विशेष सूट

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील असे अनेक तरुण आहेत, जे पोलिस अधिकारी किंवा कॉन्स्टेबल बनण्याचे स्वप्न उरी बाळगून आहेत, आणि त्यासाठी जीवतोड प्रयत्नदेखील करत आहेत, मात्र याबरोबरच असेही काही तरुण आहेत, की ज्यांची वयोमर्यादा ओलांडल्यामुळे ते आता पुन्हा भरतीसाठी अर्ज करू शकत नाहीत. तर अशा सर्वांसाठी महाराष्ट्र सरकारकडून वयोमर्यादेत विशेष सूट देण्यात आली आहे. यामुळे अनेक तरुणांचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र सरकारने पोलीस दल आणि तुरुंग विभागात १५,६३१ पदांसाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील वयोमर्यादेत विशेष सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्याचा फायदा महाराष्ट्रातील हजारो तरुणांना होणार आहे.

सरकारी सूत्रांनुसार, वयोमर्यादेतील ही सवलत केवळ या विशेष भरती प्रक्रियेपुरती मर्यादित असेल. उमेदवारांना अटी आणि शर्तींचे पालन करणे बंधनकारक असेल आणि सर्व निवड प्रक्रिया पूर्व-निर्धारित मानकांनुसार असेल. या निर्णयाबद्दल महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड उत्साह आहे. सोशल मीडियावरही हे स्वागतार्ह पाऊल असल्याचे म्हटले जात आहे.

## सिडको विस्थापित गावांना मिळाली जुनी ओळख

■ गावांची नावे पूर्ववत करण्याचा निर्णय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांना आता त्यांची जुनी ओळख परत मिळाली आहे. सिडकोने या गावांना आर-१, आर-२, आर-३, अशी नवीन नावे दिली होती, ज्यामुळे त्यांची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख पुसली जात होती. यामुळे, गावातील रहिवाशांनी आपली जुनी ओळख कायम ठेवण्यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांच्या माध्यमातून पाठपुरावा केला आणि या प्रयत्नांना आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले आणि अखेरीस सिडकोने गावांना त्यांची जुनी नावे परत देण्याचा निर्णय घेतला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघीवली वाडा, वरचे ओवळे, कोंबडभूजे, तरघर, गणेशपुरी आणि उलवे ही गावे विस्थापित झाली, पण त्यांच्या खरी ओळख जपण्याऐवजी सिडकोने त्यांना आर-१, आर-२, आर-३, आर-४, आर-५ अशी नवीन नावे दिली आणि गावांचा इतिहास व संस्कृती पुसून टाकली. या गावांना त्यांची जुनी ओळख कायम राहावी यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांनी पाठपुरावा केला होता. त्याला आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ देऊन सिडकोने आता या गावांना जुनी ओळख कायम केली आहे. त्यानुसार आता जुन्या नावाची ओळख गावांना परत मिळाली असून **(पान २ वर..)**

> **विमानतळबाधित गावांना ओळख मिळून देण्यासाठी दहा गाव समिती आणि आम्ही पाठपुरावा केला होता. त्याला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी पाठबळ दिले. त्यामुळे आता आम्हाला आमची जुनी ओळख मिळणार आहे. यामुळे आमच्या भागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.**
>
> **-समीर मदन केणी, पंचायत समिती अध्यक्ष, वडघर विभाग, भाजप**



## पनवेलमध्ये एआयचा प्रसार; आमदार प्रशांत ठाकूर यांचे ध्येय


**पनवेल : रामप्रहर वृत्त**



एमकेसीएल प्रादेशिक बैठकीत नव्या संकल्पांचा उच्चार

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) आयोजित प्रादेशिक बैठक पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत राज्यातील सुमारे २०० केंद्रांचे एएलसी समन्वयक सहभागी झाले होते. विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण, अनुभवांची देवाणघेवाण तसेच आगामी योजनांवर सखोल चर्चा या बैठकीत करण्यात आली.

भविष्यात पनवेल परिसरात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)चा प्रसार वेगाने करण्याचे ध्येय आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी (दि. ११) झालेल्या या बैठकीच्या उद्घाटन सत्रात मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**




## द्रोणागिरी नोडमध्ये आज भाजप कार्यालयाचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

भाजप उरण द्रोणागिरी नोड जनसंपर्क कार्यालय उद्घाटन सोहळा व नवीन पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा शनिवारी (दि.१३) अक्षर बिल्डींग जवळ, प्लॉट न.३३, सेक्टर ४७, द्रोणागिरी, उरण येथे होणार आहे. कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची प्रमुख उपस्थीती लाभणार आहे. राज्य परिषद सदस्य रवी भोईर, तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, द्रोणागिरी नोड अध्यक्ष शेखर पाटील यांचे सहकार्य लाभणार आहे.



# महाराष्ट्र-आयोवा भागीदारीमुळे विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारे खुली होणार -मुख्यमंत्री



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र - आयोवा (अमेरिका) यांच्यातील भागीदारीमुळे कृषी, जैवतंत्रज्ञान, वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा व तंत्रज्ञान अशा विविध महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारे खुली होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोवाबरोबर करण्यात आलेल्या सामंजस्य करारानंतर केले.

अमेरिकेतील कृषिप्रधान आयोवा राज्याशी महाराष्ट्राने ऐतिहासिक सामंजस्य करार केला. आयोवा हे अमेरिकेचे 'फूड बास्केट' म्हणून प्रसिद्ध असून शेती व कृषितंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगत राज्य मानले जाते. या कराराद्वारे महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेती, कृषितंत्रज्ञान, डिजिटायझेशन, आरोग्य, व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य विकास, पर्यटन, क्रीडा, जैवतंत्रज्ञान, सामाजिक-आर्थिक सेवा, नवीकरणीय ऊर्जा आणि पायाभूत सुविधा विकास या महत्त्वाच्या क्षेत्रांत नव्या संधी निर्माण होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आयोवाच्या राज्यपाल किम रेनॉल्ड्स यांच्या उपस्थितीत हा करार मुंबईतील ताज पॅलेस हॉटेलमध्ये झाला. याप्रसंगी मुख्य सचिव राजेशकुमार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, तसेच आयोवाचे कृषी सचिव माईक नैग, विकास प्राधिकरण संचालक डेबी दुर्हम आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आयोवा हे उत्पादन व कृषितंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य राज्य आहे. त्यामुळे त्यांच्यासोबतचा हा करार महाराष्ट्रातील शेती, तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रासाठी एक मोठी संधी आहे. आयोवा विद्यापीठ आणि कृषी विद्यापीठे यांच्या संयुक्त सहकार्यातून अत्याधुनिक तंत्रज्ञान महाराष्ट्रात आणले जाईल. भारताने नवीकरणीय ऊर्जेत केलेली प्रगती उल्लेखनीय आहे आणि या करारामुळे या क्षेत्रात आणखी नवे प्रकल्प साकारतील.

## या करारामुळे होणारे फायदे :

***** *शेतीत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर - आयोवाची आधुनिक कृषी तंत्रज्ञान, यंत्रणा व संशोधन महाराष्ट्रात आणता येईल, ज्यामुळे उत्पादनक्षमता वाढेल.*
***** *अन्नप्रक्रिया उद्योग वाढ - शेतमालाला अधिक मूल्य मिळेल, निर्यात संधी वाढतील.*
***** *डिजिटलायझेशन व तंत्रज्ञानात सहकार्य - स्मार्ट गव्हर्नन्स, ई-सेवा व डिजिटल शेतीसाठी नवीन उपाय महाराष्ट्रात लागू होतील.*
***** *आरोग्य क्षेत्रातील सुधारणा - आयोवाच्या आरोग्यसेवा प्रणाली, संशोधन व प्रशिक्षणामुळे ग्रामीण व शहरी आरोग्य सेवा सुधारतील.*
***** *कौशल्य विकास व नोकऱ्या - व्यावसायिक प्रशिक्षण, नवीन कौशल्ये व औद्योगिक सहकार्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील.*
***** *अक्षय ऊर्जा व पर्यावरण संरक्षण - स्वच्छ ऊर्जेच्या प्रकल्पांमुळे वायूप्रदूषण कमी होईल व शाश्वत विकासाला चालना मिळेल.*
***** *पर्यटन व क्रीडा विकास - दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यटन व्यवसाय आणि क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन मिळेल.*
***** *आर्थिक गुंतवणूक व औद्योगिक वाढ - अमेरिका व भारतातील कंपन्यांमध्ये थेट भागीदारी, गुंतवणूक व व्यापार वाढेल.*
***** *शिक्षण व संशोधन सहकार्य - विद्यापीठे व संशोधन केंद्रांमधील संयुक्त प्रकल्पांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील अनुभव मिळेल.*
***** *आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा - महाराष्ट्राचा जागतिक नकाशावर औद्योगिक व तंत्रज्ञान भागीदार म्हणून दर्जा वाढेल.*

महाराष्ट्राने याआधी जपान व जर्मनीसोबत सिस्टर-स्टेट करार करून व्यापार, उद्योग व सांस्कृतिक देवाणघेवाणीला गती दिली आहे. अमेरिकेतील एखाद्या राज्यासोबत हा पहिलाच करार असून तो भारत-अमेरिका संबंधांना अधिक बळकट करेल. राज्यपाल किम रेनॉल्ड्स यांनी महाराष्ट्राशी दीर्घकालीन भागीदारी करण्याची इच्छा व्यक्त केली असल्याने दरवर्षी आयोवाचे शिष्टमंडळ भारतात येईल तर महाराष्ट्राचे शिष्टमंडळ आयोवाला भेट देईल. परस्पर राज्यातील विविध क्षेत्रातील ज्ञानाचा उपयोग दोन्ही राज्याच्या विकासासाठी होणार आहे

हा करार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'जागतिक सहकार्य आणि राज्यांची आंतरराष्ट्रीय भागीदारी' या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. यामुळे राज्यातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक आणि संशोधकांना नवे मार्ग खुले होतील आणि महाराष्ट्राच्या प्रगतीला गती मिळेल.

## राज्यात ५९ मोबाईल फॉरेन्सिक लॅब कार्यान्वीत; गुन्हे सिद्धतेला वेग

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

सध्या पोलिसांसमोर नवनवीन गुन्ह्यांचे आव्हान उभे ठाकले आहे. दिवसागणिक गुन्ह्याचे स्वरूप बदलत आहे. गुन्हेगारांकडून गुन्ह्यासाठी होत असलेल्या नवीन संकल्पनांचा उपयोग गुन्ह्याची उकल करताना अडचणीचे ठरत आहे. बदलत्या गुन्हेगारीनुसार तपासाकरिता असलेल्या यंत्रणेतही बदल होणे आवश्यक होते. त्यानुसार जलद गतीने तपास पूर्ण होण्यासाठी 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' (न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा) ची सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २७ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रात २१ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचा शुभारंभ करण्यात आला आणि महाराष्ट्र देशातील मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करणारे पहिले राज्य ठरले. या लॅबचा विस्तार वाढवून २१ वरून ५९ मोबाईल फॉरेन्सिक लॅब सुरू करण्यात आल्या आहेत.

राज्यात मुंबई शहरातील पूर्व विभागात (चेंबूर), पश्चिम विभागात वांद्रे, उत्तर विभागात कांदिवली, मध्य विभाग भायखळा, दक्षिण विभागातील नागपाडा येथे प्रत्येकी एक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. तर मुंबई उपायुक्त रेल्वे स्टेशन मध्य परिमंडळात एक व्हॅन देण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई उपयुक्त परिमंडळात तीन, नागपूर उपायुक्त परिमंडळात पाच, ठाणे उपायुक्त परिमंडळात १, मीरा भाईंदर मध्ये १, पुणे १, पिंपरी चिंचवड १, सोलापूर १, नाशिक १, छ. संभाजीनगर देण्यात आली आहे.

पूर्वी मानवी निरीक्षणावर अवलंबित्व असलेल्या प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांवर आणि प्राथमिक साक्षींवर मोठा भर दिला जात असे. तसेच कमी प्रमाणात डीएनए विश्लेषण व मर्यादित स्वरूपामुळे गुन्ह्याचा तपास जलद गतीने होत नव्हता. मात्र मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनसारख्या प्रगत तंत्रज्ञानाच्या उपयोगाने गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी जैव-रासायनिक, रासायनिक, जैविक, भौतिक आणि डिजिटल पुरावे गोळा करणे शक्य होत आहे.

या मोबाईल व्हॅन्समुळे गुन्ह्याच्या ठिकाणी पुरावे गोळा करण्याचे काम जलदगतीने पूर्ण होत आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या मुंबई मुख्यालयाअंतर्गत मोबाईल व्हॅनमुळे विविध गुन्ह्यांमध्ये गुन्हा घडलेल्या ठिकाणी १५५५ पुरावे गोळा करण्यात आल्याची नोंद घेण्यात आली आहे. अशाप्रकारे राज्यात आतापर्यंत एकूण ३४३२ पुरावे गोळा करून गुन्हा उकल करण्यासाठी मदत मिळाली आहे.अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या फॉरेन्सिक व्हॅनने गोळा केलेल्या पुराव्यांमध्ये पारदर्शकता येवून गुन्हा सिद्धतेच्या कामाला वेग प्राप्त झाला आहे.

## लाखोंची बेकायदेशीर वाहने जप्त; भंगार व्यावसायिकावर गुन्हा दाखल

**महाड: प्रतिनिधी**

महाड येथील भंगार व्यवसायिक विनापरवाना आपल्या अड्ड्यावर वाहन घेऊन त्यांची विलेवाट लावत असल्याने त्याच्या विरोधात कारवाई करत एमआयडीसी पोलिसांनी वहाने जप्त करून कारवाई केली आहे. महाड एमआयडीसी पोलिसांनी त्याच परिसरातील मौजे वडगाव गावचे हद्दीत काळभैरव मंदिराचे बाजूला असलेल्या एक भंगार व्यवसायिक परप्रांती विरोधात गुन्हा दाखल केला आहे.



एमआयडीसी पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार महपुस मजीदुल्हा खान ३८-धंदा -भंगार, रा. नागलवाडी याचा मौजे वडगाव गावचे हद्दीत काळभैरव मंदिराचे बाजूला भंगार चा व्यवसाय आहे हा व्यवसायिक बेकायदेशीर वाहनांची विलेवाट लावण्याचा काम करतो अशी माहिती एमआयडीसी पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी या भंगार अड्याची दि.११/९/२०२५ रोजी संध्याकाळी ६:४० वातपासणी केली असता त्या ठिकाणी पिवळ्या रंगाची आयशर कंपनीची स्कूल बस क्र. एमएच ०४ जी ७६३४ किंमत ५ लाख रुपये, पिवळ्या रंगाचा टाटा कंपनीचा छोटा हत्ती क्र. एमएच ०९ डीए ९९२१ किंमत १ लाख रुपये, सिल्वर रंगाची होंडा सिटी कार क्र. एमएच ४३ एन ६८६८ किंमत १ लाख रुपये, मॅटडोअर क्र. एमएच ०६ बीजी १६३६ किंमत ५० हजार रुपये, पांढऱ्या रंगाची मारुती स्विफ्ट क्र. एमएच ०२ बीजे ८६९४ किंमत १ लाख रुपये अशी एकूण आठ लाख पन्नास हजार रुपये किमतीची वाहने जप्त करण्यात आली आहेत.

याप्रकरणी महपुस मजीदुल्हा खान याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक गतिमान, लोकाभिमुख व कार्यक्षम होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी जन्मदिनी दि.१७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.०२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे.

सेवा पंधरवडा च्या पहिल्या टप्प्यात दि. १७ सप्टेंबर ते दि.२२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पाणंद रस्ते मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत अतिक्रमीत शिव व पाणंद रस्त्याचे सीमांकन व मोजणी करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देणे, अतिक्रमित रस्ता असल्यास अतिक्रमणे दूर करणे, रस्त्याच्या नोंदी महसूल अभिलेखात घेणे, इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत गाव नकाशावर असलेले रस्ते व वहिवाटीचे रस्ते ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, व स्थानिक पदाधिकारी यांच्यामार्फत शिवार फेरीव्दारे रस्त्याची पाहणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

या निमित्ताने सर्व शेतकरी बांधवांनी शेतावर पाहाणी करतेवेळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्या सोबत सहभाग नोंदवावा. तसेच शेतरस्त्याच्या वादाबाबात काही समस्या असल्यास दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या रस्ता अदालतीमध्ये सहभाग घ्यावा.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेत रस्त्यासंदर्भात अत्यंत महत्त्वकांक्षी असे अभियान दि. १७ सप्टेंबर ते दि.२२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

## जिद्दीच्या बळावर प्रशासकीय परीक्षा पास झालेल्या श्रुती गायकवाडचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक पाचाड गावातील सिद्धार्थ भागुराम गायकवाड यांची कन्या श्रुती हिने जिद्दीच्या जोरावर प्रशासकीय परीक्षा दिली आणि श्रुती हिला महाट्रान्सको मध्ये उपअभियंता पदावर नेमणूक देखील झाली मात्र नियतीला हे भावले नाही आणि अल्पशा आजारामध्ये तिचे निधन झाले.

बौद्धजन उत्कर्ष मंडळ मुंबई पाचाड या मंडळाचे कार्याअध्यक्ष सिद्धार्थ भागुराम गायकवाड नोकरी व्यवसाय निमित्त मुंबई येथे आहेत. त्यांची द्वितीय मुलगी



कु. श्रुती सिद्धार्थ गायकवाड जिने जीवाची बाजी लावून अथक परिश्रम घेऊन प्रशासकीय परीक्षा दिली होती.उत्तम यश संपादन करत महाराष्ट्र शासनाच्या महाट्रान्सको या कंपनी मध्ये उप. अभियंता या पदावर नुकतीच रुजू झाली होती.

एकीकडे तिच्या यशाचे गोड कौतुक सर्वत्र सुरू होते. जन्मगाव असलेल्या पाचाड मध्ये देखील तिचा नुकताच सत्कार झाला होता. तर महाड मध्ये देखील समाजाच्या वतीने सत्कार केला जाणार होता.

श्रुती हिला अचानक ताप आल्याने अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या अल्पशा आजारातच मृत्यूशी झुंज देत असताना वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी १२ सप्टेंबर रोजी दुपारी १:३० वाजता आकस्मित निधन झाले. श्रुती सिद्धार्थ गायकवाड या तरुणीचे यश आणि त्यातून सुरू झालेले भावी आयुष्य याला नियतीने मात्र साथ दिली नाही.

## माकडाने दुचाकीवर झडप घातल्याने एक जण ठार

**तापोळा : प्रतिनिधी**

महाबळेश्वर तालुक्यातील तापोळा रस्त्यावर गुरुवारी एक हृदयद्रावक घटना घडली. चिखली गावच्या हद्दीत एका माकडाने अचानक दुचाकीवर झडप घातली आणि भीषण अपघात घडला. या अपघातात पतीचा मृत्यू झाला असून पत्नी गंभीर जखमी झाली आहे. मृत व्यक्तीचे नाव आनंद सखाराम जाधव (वय ५०, रा. देवळी, ता. महाबळेश्वर) असे आहे. नागरिकांनी वन विभागाकडे आणि स्थानिक प्रशासनाकडे माकडांच्या वाढत्या उपद्रवावर नियंत्रण आणण्याची मागणी केली आहे.

## पान १ वरुन

### रायगड जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची अंमलबजावणी करा

याबाबत या बैठकीत सविस्तर आठावा घेण्यात आला. किती योजनांची कामे सुरू आहेत. त्यापैकी किती कामे पूर्ण झाली आहेत. ज्या योजनांची कामे अपूर्ण आहेत त्याची कारणे काय आहेत याबाबतची माहिती या बैठकीत घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

***अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे -खासदार धैर्यशील पाटील***

या बैठकीत खासदार धैर्यशील पाटील यांनी, केंद्र सरकार पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योनांपैकी ज्यांची कामे अपूर्ण आहेत ती कामे तातडीने पूर्ण कराव्यात. प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व शुद्ध पाणी वेळेत पोहचविणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. केवळ कागदावर योजना पूर्ण दाखवू नका, लोकांच्या हंड्यात पाणी पोहोचले का? असा थेट सवाल करत अधिकाऱ्यांना जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले.

### सिडको विस्थापित गावांना मिळाली जुनी ओळख

सेक्टर आर-१ हे 'चिंचपाडा सेक्टर आर १', सेक्टर आर-२ हे 'चिंचपाडा सेक्टर आर २', सेक्टर आर-३ हे 'चिंचपाडा व कोल्ही सेक्टर आर ३', सेक्टर आर-४ हे 'कोपर सेक्टर आर ४', सेक्टर आर-५ हे 'वाघिवलीवाडा सेक्टर आर ५', सेक्टर १ हे 'वरचे ओवळे सेक्टर १', सेक्टर २४ हे 'उलवे सेक्टर २४', सेक्टर २५ हे 'तरघर व कोंबडभुजे सेक्टर २५', सेक्टर २५ ए हे 'कोंबडभुजे व गणेशपुरी सेक्टर २५', सेक्टर २६ हे वाघिवली सेक्टर २६, तर सेक्टर १३ हे 'डुंगी सेक्टर ३' या नावाने अर्थात जुन्या नावाने ओळखले जाणार आहे. सिडकोने पनवेल परिसरात होणाऱ्या विमानतळाच्या बांधणीसाठी चिंचपाडा, कोल्ही कोपर, पारगाव, ओवळे, कोंबडभुजे, उलवेसारख्या भागातील जमिनी संपादित केल्या जमिनी संपादित करताना त्यांना मोबदला म्हणून २२.५ टक्के प्रमाणे भूखंड देण्यात आले.

नवी मुंबई विमानतळ उभारताना जी गावे विस्थापित आली आहेत त्यांना सिडकोने भूखंड देऊन तेथे इमारती उभ्या राहिल्या. गावाचे गावपण जाते की काय असा प्रश्न तेव्हा अनेकांना पडू लागला. भूखंडावर इमारती उभ्या राहिल्या. भूखंड सिडकोचे असल्याने त्यांना नावेही सिडकोने दिली. मात्र गावांची ओळख कायम रहावी यासाठी सिडकोकडे मागणी करण्यात आली आणि त्या मागणीला आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले. या संदर्भात सिडकोने महत्वपूर्ण निर्णय घेत गावांना आता त्यांची जुनी ओळख कायम ठेवली आहे.

दरम्यान, आज आमच्या गावाचं पुनर्वसन होऊनसुद्धा त्याला मूळ नावानेच ओळख मिळाली, हे आमच्यासाठी अभिमानाचं आणि आनंदाचा क्षण आहे. गावाचं नाव जसंच्या तसं जपलं गेलं म्हणजेच आमच्या परंपरेला, इतिहासाला आणि आत्मसन्मानाला सलाम करण्यात आला आहे. ही महत्त्वाची बाब शक्य झाली ती आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या प्रयत्नांमुळे. गावकऱ्यांच्या भावना ओळखून, प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून, प्रत्येक कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत कौतुकास्पद आहे. आज पुनर्वसित गावातील प्रत्येक नागरिकांच्या मनात समाधान आहे की, घर नवं झालं, जागा नवी झाली, पण गावाचं नाव तेच राहिलं. आमदार साहेबांनी दाखवलेला हा संवेदनशील दृष्टिकोन खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीपणाचे उत्तम उदाहरण आहे. गावकऱ्यांच्या वतीने आम्ही आमदार साहेबांचे मनःपूर्वक आभार मानतो, असे भाजप पनवेल तालुका पश्चिम मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ यांनी सांगितले.

### पनवेलमध्ये एआयचा प्रसार; आमदार प्रशांत ठाकूर यांचे ध्येय

एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी आपल्या सादरीकरणातून एआयच्या मदतीने केंद्रांना नवनवीन संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांशी संवाद अधिक प्रभावीपणे साधण्यासाठी, मार्केटिंग अधिक स्मार्ट पद्धतीने राबवण्यासाठी तसेच व्यवसायवृद्धीसाठी एआयचा प्रभावी वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत शिक्षण, कौशल्यविकास आणि नवे तंत्रज्ञान यांमधील संधींवर भर देण्यात आला. दिवसभर चाललेल्या या चर्चासत्रांमुळे केंद्रांना भविष्यातील कामकाजाची दिशा लाभेल, असा विश्वास उपस्थित समन्वयकांनी व्यक्त केला. या प्रसंगी एएलसी समन्वयकांचा विशेष गौरव सत्कारही करण्यात आला.

## पेणमध्ये नागरिकांसाठी अमृत मेळावा

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, अमृत या महाराष्ट्र शासनाची स्वायत्तता संस्था आयोजित खुल्या प्रवर्गातील ब्राह्मण, गुजराती, मारवाडी, सिंधी, कच्छी, पाटीदार, राजपूत आदि प्रवर्गासाठी दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी अमृत मेळाव्याचे आयोजन पेण भाऊसाहेब नेने महाविद्यालय सभागृह येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदर मेळाव्यात प्रमुख पाहुणे व वक्ते अँड. बापूसाहेब नेने, बँक ऑफ इंडियाचे पेन शाखा व्यवस्थपाक सौरभ पणशीकर उपस्थित राहणार आहेत. सदर मेळाव्यात उद्योग, व्यवसाय, शैक्षणिक कर्ज लाभ या योजनांची संपूर्ण माहिती व मार्गदर्शन संबंधित अधिकारी वर्गाकडून होणार आहे. याकरीता अँड. मंगेश नेने ९९७५००७६००, अमृत रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे ९११२२२७८५९, अमित सामंत कोकण विभाग व्यवस्थापक ८२७५४५५४६५ तसेच महेश हेलवाडे पेण ब्राह्मण सभा ९७६४९०३५९८ यांची संपर्क साधून मेळाव्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मेळाव्याचे निमंत्रक अँड. मंगेश नेने यांनी केले आहे.

## दुखवटा

### प्रल्हाद इंगवले

**मुरूड :** येथील सर एस.ए. विद्यालयाचे सेवानिवृत्त पी.टी. शिक्षक प्रल्हाद खाशाबा इंगवले यांचे निधन झाले.



इंगवले सर हे केवळ पी.टी. शिक्षक नव्हते, तर उत्तम वाचक, वक्ते आणि शिस्तप्रिय अध्यापक म्हणून विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या मनावर त्यांनी कायमस्वरूपी छाप पाडली होती. .त्यांच्या निधनामुळे इंगवले परिवारावर मोठा आघात झाला आहे. या दुःख सहन करण्याची शक्ती परमेश्वर त्यांच्या कुटुंबीयांना देवो आणि त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशा शब्दांत सर्व स्तरांतून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

### शंकरराव येरूणकर

**पोलादपूर :** पोलादपूर शहरामध्ये हॉटेल व्यवसाय तसेच बांधकाम व्यवसायामध्ये नावलौकिक प्राप्त करणारे शंकरराव येरूणकर यांचे शुक्रवारी मुंबईतील ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये निधन झाले.त्यांचा पुत्र



देवकुमार येरूणकर हे परदेशात स्थायिक असल्याने शनिवारी भारतात आल्यानंतर शंकरराव येरूणकर यांचे पार्थिव पोलादपूर येथे आणून अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहिती राव मराठा सेवा संघातर्फे देण्यात आली.

# पनवेलच्या खेरणेमध्ये दुकानातून गांजा हस्तगत

## तालुका पोलिसांनी केले दोन जणांना अटक





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत खेरणे गाव कमानीजवळील एका दुकानातून हजारो रुपये किंमतीचा बेकायदेशीररित्या विक्रीसाठी ठेवलेला गांजा हस्तगत केला असून या प्रकरणी दोघा जणांना अटक करण्यात आली आहे.

तालुक्यातील खेरणे गाव येथील एका दुकानात बेकायदेशीररित्या गांजा ठेवून त्याची विक्री होत असल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे, सपोनि अनिरुद्ध गिजे, पोउपनि हर्षल राजपूत, सुभाष डिघे, पो. हवा. धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, पो.शि. भगत, खताळ आदींच्या पथकाने सापळा रचून छापा टाकला. या वेळी तेथील दुकानात जवळपास २१ हजार रुपये किंमतीचा ११७० ग्रॅम वजनाचा उग्र वासाचा कोरडा गांजा तसेच इतर वस्तू असा मिळून २२ हजार ६३० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

याप्रकरणी अभिषेक शर्मा (२४ रा.वावंजे) व राहूल सावळे (२२ रा.वावंजे) या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका आरोपीचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

## घरफोड्या करणारे दोघे गजाआड

**पनवेल :** घरफोड्या करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी घरफोडीचा प्रयत्न करताना पकडले असून त्यांच्याकडून नंबर प्लेट नसलेल्या मोटरसायकल सह मोबाईल, कटर, पट्टीपांना व स्क्रू ड्राइवर हस्तगत केले आहे. आरोपी दत्तात्रय गोडसे (वय २४, रा. सांगोला) व त्याचा सहकारी सचिन चौहान (वय २१, रा. खेड) हे दोघेजण करंजाडे भागामध्ये संशयित रित्या फिरत असताना पोलीस शिपाई साईनाथ मोकळ याना मिळून आल्याने त्यांना तातडीने पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांच्याकडे ५१,५०० रुपयांची विना नंबरची पल्सर मोटारसायकल, मोबाईल, कटर, पट्टीपांना व स्क्रू ड्राइवर मिळून आल्याने त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आहे.

## निवडक

### गुलाब बागवान यांची निवड

**पनवेल :** सुजाण नागरिक मंच अंतर्गत प्रस्थापित, संविधान गुणगौरव समिती च्या पनवेल तालुका मुख्य समन्वयकपदी गुलाब हुसेन बागवान यांची निवड करण्यात आली. त्यावेळी, गुलाब बागवान यांनी मी नक्कीच संविधानाची जनजागृती आणि दिलेली जबाबदारी पनवेल तालुक्यामध्ये योग्यरीत्या पार पाडेल असा विश्वास दाखविला.





**खारघर : अज्वा ड्राय फ्रुट्सच्या प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, अज्वाचे मालक आरिफ पटेल, इक्बाल नावरकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप ओबीसी पनवेल उपाध्यक्ष सागर भोईर यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**

# जितेंद्र इंगळे यांच्याकडे तहसीलदारांचा पदभार

**पनवेल : वार्ताहर**

मॅरेथॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लिमिटेड या कंपनीला फेवर केल्यामुळे विजय पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली आहे. त्यामुळे त्यांचा पदभार अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यामुळे इंगळे यांना काही काळ संपूर्ण तालुक्याचा कार्यभार सांभाळावा लागणार आहे.

पनवेल तालुका महसुली दृष्ट्या मोठा असल्याने त्याचे विभाजन करून काही वर्षांपूर्वी अप्पर तहसीलदार पद निर्माण करण्यात आले. महसुली मंडळांची विभागणी करण्यात आली. कामकाजाच्या दृष्टिकोनातून हा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला होता. अप्पर तहसीलदार यांचे कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये सुरू आहे. दरम्यान दोन्ही कार्यालय त्याचबरोबर अधिकाऱ्यांमध्ये फारसे सख्य नव्हते. अधिकार त्याचबरोबर हद्द यावरून कुरबुर आणि शीतयुद्ध सुरू होते. दरम्यान पोयंजे परिसरातील सहा गावांमध्ये औद्योगिक कारणासाठी मॅरेथॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने २००७ ला जमीन खरेदी केली, परंतु पंधरा वर्षांच्या कालावधीमध्ये या जागेचा वापर न केल्यामुळे संबंधित नियमाचे उल्लंघन केले. त्यात बिगर शेती सनद मिळावी यासाठी मॅरेथॉन कडून तहसीलदार विजय पाटील यांनी रूपांतरीय कर भरून घेतला.

कामात अनियमितता दाखवले म्हणून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. दरम्यान पाटील यांना आता जिल्हाधिकारी कार्यालयात हजेरी लावावी लागते. त्यामुळे अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांच्याकडे पनवेल तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

# १२ तासांचे परिपत्रक मागे घेण्याची कामगारांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

राज्य सरकारने कामगारांसाठी जारी करण्यात आलेल्या १२ तास कामाच्या परिपत्रकाबाबत भारतीय मजदूर संघाचे राज्य कामगार मंत्री ॲड. प्रकाश फुंडकर यांची भेट घेऊन हा निर्णय मागे घेण्याची मागणी मजदूर संघाने केली आहे.

या निर्णयामुळे कामगार वर्गावर अन्याय होणार असून, त्याचे गंभीर परिणाम होतील. कामगार मंत्र्याना दिलेल्या निवेदनात १२ तास कामकाजामुळे कोणते परिणाम होतील याबाबत काही मुद्दे मांडण्यात आले आहेत.

भारतीय मजदूर संघाच्या वतीने प्रदेशातील प्रमुख पदाधिकारी, विविध जिल्ह्यातील कामगार



संघटनाचे नेते व संबंधित औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधिंनी आपापली मते मांडली. कामगारांचे हक्क रोजगाराची हमी आणि कुटुंबियांच्या आरोग्यासाठी आमचा संघर्ष सुरूच राहील, असे भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव सुरेश पाटील यांनी सांगितले.

# पनवेल शहरातील रस्त्यांची पाहणी करून डागडुजी करा

## मनोज भुजबळ यांची पालिकेकडे मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील रस्त्यांची पाहणी करून डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले आहे.

भुजबळ यांनी निवेदनात म्हटले आहे की, रेसिडन्टस् वेल्फेअर ग्रुप हा नवीन पनवेल मधील जागरुक नागरिकांची संस्था आहे. ही संस्था ही नागरीकांच्या समस्या आणि प्रशासनाकडून वेळोवेळी पुरविल्या जाणाऱ्या सुविधा यावर कार्यरत आहे. माझ्याकडे संस्थेतील पदाधिकारी प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन दिले आहे. त्यावरून नागरीकांच्या समस्या आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नवीन पनवेल तसेच जुने पनवेल परिसरातील रस्त्यांच्या समस्या गंभीर आहेत. जवळपास सर्वच रस्ते खड्डेमय झालेले आहेत. त्यावरून चालताना किंवा दुचाकी, चारचाकी वाहने







घेऊन जाताना किरकोळ आणि गंभीर अपघात होण्याचा धोका वाढलेला आहे.

रस्ते डागडुजी किंवा नविन कंत्राट काढतेवेळी उत्तम प्रतीचे मटेरीयल वापरुन कामे करून घ्यावीत, जेणेकरून प्रशासनाला व नागरीकांना त्रास होणार नाही. तसेच विनंती वजा सुचना अशी की, ज्या कंत्राटदाराला रस्त्यांचे कंत्राट मिळाले आहे त्यांचे नाव, मोबाईल नंबर हे त्या रस्त्यांच्या एका बाजुला ठळक अक्षरात प्रसिध्द करावे. निवेदनासोबत, न्यु पनवेल रेसिडन्स वेलफेअर ग्रुप यांची तक्रार माहितीस्तव व पुढील कारवाईकरीता जोडली आहे.

# उलवे येथील शाळेमध्ये जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अपर्णा शहा संस्थापित ईट प्ले रीड ऑर्गनायझेशनमार्फत उलवे येथील शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल शाळेमध्ये जनजागृती करण्यात आली.

उत्साहवर्धक उपक्रमात, ईट प्ले रीड या ना-नफा संस्थेने निरोगी खाणे, आनंदी खेळ आणि उत्सुक वाचनाला नवीन उंचीवर नेण्याचे ध्येय हाती घेतले आहे. अलीकडेच, संस्थेने दैनंदिन जीवनात या महत्त्वाच्या घटकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी उलवेमधील शकुंतला रामशेठ ठाकूर शाळेला भेट दिली. टीमच्या सदस्यांनी तेथील विद्यार्थी व शिक्षक यांना एक



सादरीकरण दिले. सादरीकरणाने केवळ सकस आहाराचे फायदे अधोरेखित केले नाहीत तर खेळाचा आनंद आणि उत्सुक वाचनाच्या परिवर्तनीय शक्तीवरही भर दिला.

या संदेशांना बळकटी देण्यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये लक्षवेधी प्ले कार्ड आणि डायरीचे वाटप केले. ही सामग्री संस्थेच्या मूलभूत मूल्यांची दैनंदिन स्मरणपत्रे म्हणून काम करते आणि मुलांना त्यांच्या कल्याणासाठी सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रोत्साहित करते. ईट प्ले रीड टीमने पोहचलेल्या मुलांचा आत्मविश्वास वाढल्याने त्याचा परिणाम दिसून आला. यापैकी अनेक विद्यार्थ्यांना, ज्यांनी यापूर्वी असे प्रोत्साहन अनुभवले नसेल, त्यांना संस्थेच्या संदेशातून प्रेरणा मिळाली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात एव्हिएशन करिअरपर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१२) सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट समितीच्या वतीने एव्हिएशन करिअर या विषयावर माहितीपूर्ण सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारमध्ये कॅप्टन पूजा टंडन एअर क्रू प्रो ट्रेनिंग इन्स्टिटच्यूट यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना एव्हिएशन उद्योगातील विविध संधी,



कार्यप्रणाली आणि भविष्यातील करिअरविषयक दिशा यांविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना कस्टमर सर्विस, रॅम्प हॅंडलिंग, फ्लाईट डिस्पॅचर व हॉस्पिटलिटी यांसारख्या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधींबाबत माहिती देण्यात आली तसेच एव्हिएशन इंडस्ट्रीचा विस्तार, भविष्यातील मागणी आणि कौशल्यांची गरज यावरही चर्चा करण्यात आली.

या उपक्रमामध्ये एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि त्यांनी सेमिनारमधून उद्योगासंबंधित महत्वपूर्ण माहिती मिळवली तसेच उपस्थित विद्यार्थ्यांनी हा अनुभव उपयुक्त व प्रेरणादायक ठरल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट या समितीतील सर्व प्राध्यापकांचे तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. अर्पिता नायक, समन्वयक सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग व प्लेसमेंट यांनी केली तसेच या समितीतील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# सीकेटी महाविद्यालयात शिक्षक दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील कर्मचारी संस्था आणि कल्याण समितीच्या वतीने बुधवारी (दि.१०) महाविद्यालयाच्या सभागृहात शिक्षक दिन कार्यक्रमाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास एफ. पी.ए. शिक्षण तंत्रज्ञान संस्था, मुंबईचे संचालक सुरेश वर्मा तथा कल्याण ज्वेलर्स पनवेलचे शाखा प्रमुख प्रशांत टि कांचनोलकर यांची प्रमुख उपस्थिती राहिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना कर्मचारी संस्था आणि कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. आर. ओ. परमार यांनी उपस्थितांना संबोधित करताना शिक्षक दिनाचे महत्व विषद करून, समाज आणि राष्ट्रउभारणी मधील शिक्षक समुदायाची अनन्यसाधारण भूमिका उधृत केली.

प्रास्ताविकानंतर एफ. पी.ए. शिक्षण तंत्रज्ञान संस्था,





मुंबईचे संचालक सुरेश वर्मा तथा कल्याण ज्वेलर्स पनवेलचे शाखा प्रमुख प्रशांत टि कांचनोलकर यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचा प्रस्तुत कार्यक्रमात यथोचित सत्कार केला. यानंतर सुरेश वर्मा यांनी उपस्थितांशी संवाद साधत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व एफ.पी. ए. शिक्षण तंत्रज्ञान संस्था, मुंबईची ध्येय-धोरणे आणि उद्दिष्ट्ये यांचा उहापोह केला.कांचनोलकर यांनी शिक्षकांची युवा पिढ्या घडविण्यातील निर्णायक भूमिका स्पष्ट केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक दिन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनीही आपले मनोगत सादर केले. याबरोबरच महाविद्यालयाच्या गौरवशाली कीर्तीचा आढावा देताना स्वायत्तता अंमलबजावणी, कोरोनाकाळातील ऑनलाईन प्रणालीचे यशस्वीरीत्या केलेलं संचालन, कोव्हीड लसीकरण कार्यक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी, नॅक चे चौथे मुल्यांकन आदी प्रक्रियेतील महाविद्यालयातील सर्व घटकांच्या अथक परिश्रमांचा उल्लेख केला.

सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांना व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्याहस्ते भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर शिक्षक दिन कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सुरेश वर्मा व प्रशांत टि कांचनोलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस.के.पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी.डी.आघाव, कलाशाखा प्रमुख प्रो.डॉ. बी.एस.पाटील, विज्ञानशाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, कर्मचारी संस्था व कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. आर.ओ. परमार आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील व मराठी विभागाच्या प्रा. नम्रता कडू तर आभार हिंदी विभागाचे डॉ. भूषण घरत यांनी मानले.

# पनवेलमध्ये पैठणी महोत्सव

## आमदारांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे सोनी पैठणी महोत्सव आणि भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१२)झाले. या महोत्सवात पनवेलमध्ये प्रथमच खास येवला येथील सोनी पैठणी साड्या थेट ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे प्रदर्शन आणि विक्री १२ ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात सुरू राहणार आहे.

रोटरी क्लबच्या वतीने नेहमीच समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात येत असतात. दरम्यान, या उपक्रमांसाठी निधीची गरज असते. हे लक्षात घेता रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल ने निधीचे संकलन करण्यासाठी पनवेल मधील विरुपाक्ष मंगल कार्यालयात सोनी पैठणी महोत्सव प्रदर्शन आणि विक्री आयोजित केले आहे.

या महोत्सवाच्या उद्घानावेळी रोटरी क्लब पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक प्रथमेश सोमण,





मोहिनी पाटील, प्रेसिडेंट अनिल ठकेकर सेक्रेटरी अतिष थोरात, डॉ. आमोद दिवेकर, डॉ. रमेश पटेल, लक्ष्मण पाटील, डॉ. संजीवनी गुणे, डॉ. कांचन दिवेकर, भागवान पाटील, शैलेश पोटे, फर्स्ट लेडी सारिका ठकेकर, योगेश महाजन, योगेंद्र कुरघोडे, सुदीप गायकवाड, ऋषिकेश बुवा रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, प्रेसिडेंट अनिल ठकेकर, सेक्रेटरी अतिष थोरात, असिस्टंट गव्हर्नर डॉ. स्वाती लिखिते यांच्यासह रोटरीचे सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दरम्यान, या महोत्सवाला पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, ममता म्हात्रे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# अस्वस्थ वर्तमान

जपानच्या पंतप्रधानांचा राजीनामा, नेपाळमध्ये तरुणांच्या आंदोलनातून पेटलेला आगडोंब आणि झालेली राजकीय उलथापालथ, फ्रान्समध्ये पुन्हा सुरू झालेली हिंसक निदर्शने आणि पाठोपाठ अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी चार्ली कर्क यांची भर कार्यक्रमात गोळ्या घालून केलेली हत्या या एका पाठोपाठ एक घडलेल्या घटनांनी जगभरातच चिंतेचे वातावरण आहे. अनेक देशांमध्ये अस्थिरता, आर्थिक विवंचना आणि हिंसक घटना घडत असल्यामुळे या अस्वस्थ वर्तमानाने जगभरात हे काय सुरू आहे असा सुन्न करणारा प्रश्न पडावा.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे निकटवर्तीय चार्ली कर्क यांच्या हत्येपाठोपाठच किरकोळ वादातून अमेरिकेतील टेक्सास येथे एका मूळच्या भारतीय व्यक्तीची सहकर्मचाऱ्याने निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आल्याने अमेरिकेतील भारतीय हबकून गेले आहेत. बुधवारी अमेरिकेतील उटा महाविद्यालयाच्या प्रांगणात हत्या करण्यात आलेले कर्क सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाचे समर्थक होते. उजव्या विचारसरणीचे कायकर्ते असलेले कर्क ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' प्रचारमोहिमेतील साथीदार होते. त्यांच्या हत्येने अमेरिकेत खळबळ उडाली आहे. कर्क यांनी अलीकडेच अमेरिकेतील भारतीयांच्या विरोधात विधाने केली होती. त्यांच्या धक्कादायक हत्येच्या पाठोपाठच किरकोळ भांडणात एका भारतीय व्यक्तीचा सहकर्मचाऱ्याने शिरच्छेद केल्याची घटना अमेरिकेतील टेक्सास येथे घडली आहे. यात मूळच्या कर्नाटकच्या चंद्रमौली उर्फ बॉब नागमल्लईया या ५० वर्षीय व्यक्तीचा बळी गेला. टेक्सासमधील मोटेलमध्ये व्यवस्थापकाचे काम करणाऱ्या चंद्रमौली यांचा बिघडलेल्या वॉशिंग मशीनवरून यॉर्दनिस याच्याशी वाद झाला. चंद्रमौली दुसऱ्या व्यक्तीची भाषांतरासाठी मदत घेऊन बोलत होते. याने संतापलेल्या यॉर्दनिसने जवळच्या मोठ्या सुऱ्याने चंद्रमौलींवर हल्ला केला. त्यांच्या पत्नी आणि मुलासमोरच त्याने चंद्रमौलींचा शिरच्छेद करून शिर बाहेर भिरकावले. या घटनेमुळे अमेरिकेतील भारतीय समुदायात भीतीचे वातावरण पसरले आहे. अमेरिकेतील नागरिकांचे मानसिक स्वास्थ्य किती बिघडलेले आहे हे अनेक घटनांमधून समोर येते आहे. कर्क यांच्या हत्येतून अमेरिकेतील बंदूक संस्कृती पुन्हा चर्चेत आली आहे. विरोधाभास असा की स्वत: कर्क बंदूक संस्कृतीचे पाठिराखे होते. हत्या झाली त्यावेळी ते 'अमेरिकेतील वाढलेले सामूहिक हत्याकांडांचे प्रकार' या विषयावर व्याख्यान देत होते आणि अचानक गोळी त्यांच्या मानेत घुसली. ट्रम्प यांनी आपल्या प्रिय मित्राला मरणोत्तर अमेरिकेचा सर्वोच्च नागरी सन्मान 'प्रेसिडेंशिअल मेडल ऑफ फ्रीडम' देण्याची घोषणा केली आहे. गेल्या अध्यक्षीय निवडणुकीत कर्क यांनी आपल्या 'टर्निंग पॉईंट यूएसए' या अ-राजकीय स्वयंसेवी संस्थेमार्फत अमेरिकेतील उजव्या विचारांच्या तरुणांना ट्रम्प यांच्या नेतृत्वाकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित केले होते. त्यामुळेच ट्रम्प राष्ट्राध्यक्षपदी निवडून येण्यात कर्क यांचे योगदान मानले गेले. ट्रम्प यांचे विश्वासू सहकारी असलेले ३१ वर्षीय कर्क समाजमाध्यमांवर व विद्यार्थी संघटनांमध्ये सक्रिय होते. त्यांच्या हत्येनंतर अधिकाऱ्यांना जवळच्या जंगलात एक रायफल सापडली असून तिच्यातील काडतुसांवर ट्रान्सजेंडर आणि फॅसिस्टविरोधी असे लिहिलेले आढळले आहे. मारेकऱ्याला अटक झाल्याचेही सांगितले गेले. कर्क यांनी हल्लीच, अमेरिका हे ख्रिस्ती राष्ट्र असल्याचे व ते तसेच रहावे असे म्हटले होते. भारतीय नागरिक अमेरिकी नागरिकांचे रोजगार घेत असून जेवढे भारतीय अमेरिकेत आले आहेत तेवढे पुरेसे आहेत असे विधानही त्यांनी हल्लीच केले होते. कर्क यांच्या हत्येनंतर अमेरिकेतील राजकीय ध्रुवीकरण वाढण्याची शक्यता आहे.**

# संकल्प रायगड जिल्हा प्रशासनाचा; जनतेच्या सेवेचा..!

आपल्या दैनंदिन जीवनात महसूल विभागाशी संबंधित अनेक कामे असतात. कधी शेतजमिनीची नोंद, कधी घराचा उतारा, तर कधी सरकारी योजनेचा लाभ... ही कामे वेळेत आणि पारदर्शकपणे व्हावीत यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत' राबवण्यात येणारा हा सेवा पंधरवडा सामान्य जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी वाढदिवसापासून (१७ सप्टेंबर, २०२५) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (०२ ऑक्टोबर, २०२५) हा 'सेवा पंधरवडा' राज्यभर साजरा होणार आहे. या कालावधीत, सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याच्या समस्या सोडवण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान पद्धतीने काम करणार आहे. या उपक्रमात राबवले जाणारे कार्यक्रम यापूर्वीही सुरू होते, परंतु या काळात ते युद्धपातळीवर आणि मोहीम स्वरूपात राबविले जातील.

यासंदर्भात शासनाने नुकताच एक निर्णय काढला असून, तो www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संकेताक २०२५०९०११०५७१५१६१९ या क्रमांकावर उपलब्ध आहे.



या अभियानाचे स्वरूप तीन टप्प्यांमध्ये विभागले आहे:

**पहिला टप्पा: पाणंद रस्त्यांची मोहीम (१७ ते २२ सप्टेंबर)**

शेतकऱ्यांसाठी शेतापर्यंत पोहोचणारे रस्ते (पाणंद/शिवरस्ते) अत्यंत महत्त्वाचे असतात. अनेकदा रस्ते नसल्यामुळे किंवा ते खराब असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल घेऊन जाण्यासाठी अडचणी येतात. या काळात जिल्हा प्रशासन खालील गोष्टींवर विशेष लक्ष देणार आहे.

रस्त्यांचे सर्वेक्षण आणि नोंदणी: ज्या पाणंद रस्त्यांची नोंद अजूनही शासकीय दप्तरात (निस्तार पत्रक व वाजिब उल अर्ज) झालेली नाही, त्यांची नोंद घेतली जाईल. महसूल विभागाच्या शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५-प्र.क्र.४५८ /भूमापन (ल-१), दि.२९.०८.२०२५ नुसार, पाणंद रस्त्यांना क्रमांक देण्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

नकाशावर चिन्हांकित करणे: अमरावती जिल्ह्यात राबवलेल्या यशस्वी प्रकल्पाच्या धर्तीवर, पाणंद रस्ते गाव नकाशावर चिन्हांकित केले जातील.

रस्ते अदालत : शेताच्या रस्त्यांमुळे होणारे वाद मिटवण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी खास 'रस्ता अदालत' आयोजित केली जाईल. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेतली जातील.

**दुसरा टप्पा: 'सर्वांसाठी घरे' उपक्रम (२३ ते २७ सप्टेंबर)**

प्रत्येकाला स्वतःचे घर मिळावे, या उद्देशाने 'सर्वांसाठी घरे' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या काळात, जिल्हा प्रशासन खालील शासन निर्णयांची अंमलबजावणी करेल:

ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, आणि (महसूल विभाग, शासन निर्णय दि. १४.१२.१९९८ व दि. ०१.०८.२०१५)

पट्टे वाटप मोहीम : घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनी गरजू व पात्र लाभार्थ्यांना कब्जेहक्काने दिल्या जातील. तसेच, रहिवासी प्रयोजनासाठी असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील.

अतिक्रमणांचे नियमितीकरण : महसूल विभागाच्या १४.१२.१९९८ च्या निर्णयानुसार, शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करून, अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील.

**तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)**

या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन काही नवीन उपक्रम राबवतील. यामध्ये नागरिकांच्या अडचणी दूर करणाऱ्या वेगवेगळ्या योजनांचा समावेश असेल.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार त्यांच्या स्तरावर सर्व संबंधित यंत्रणांसोबत बैठका घेऊन कामाचे नियोजन करतील तसेच, या अभियानात स्थानिक आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्य यांनाही सहभागी करून घेतले जाईल.

या अभियानामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येईल. या 'सेवा पंधरवड्या'ला यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा आणि नागरिकांनी देखील उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

**-मनोज सुमन शिवाजी सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे आणि रायगड-अलिबाग (अ.का)

# अव्यक्त चाफा...



इतर अनेक फुलांपैकी एक असं सोनचाफ्याचं फुलं, पण एक भावनिक नातं या फुलांशी जोडलं गेलंय. सोनचाफा नाव जरी ऐकलं तरी आवेग संचारतो. खूप साऱ्या आठवणी दाटतात.

लमला सोनचाफा फार आवडतो. इतर फुलांसारखा आकर्षक नसेल तो, पण त्याचं मूक सौंदर्य खूप काही सांगून जातं. कधी वाटतं चाफा माझ्याशी बोलतो. झाडाला जेव्हा कळी येते ती सहसा दिसून येत नाही. कळीचं फुलं होतं तेसुद्धा दिसत नाही, कारण ते पानाच्या आड दडलेलं असतं, मात्र कळीचं रूपांतर फुलामध्ये झाल्यानंतर त्याच्या सुगंधाचा दरवळ येतो तेव्हा कळतं चाफा फुलला. नकळतपणे तो साऱ्यांचं लक्ष वेधून घेतो. कधी वाटतं माणसांनीही असंच असावं अबोल आणि अव्यक्त. चाफ्याकडे पाहून नेहमीच वाटतं की त्याला काहीतरी सांगायचं आहे. कळी असल्यापासून फुलं होईपर्यंत तो शांतच असतो. त्याच्या सुगंधाचा दरवळसुद्धा तसाच मादक, पण कामुक नाही. कोमेजल्यानंतर त्याच्या पाकळ्यांना जपून ठेवावं. सुकलेल्या पाकळ्यासुद्धा सुगंध देतात. चाफ्यापाशी खूप भाव-भावना एकवटतात, फक्त त्या समजून घेता आल्या पाहिजेत. शांत तितकाच संयमी असलेला चाफा फुलांच्या गर्दीतही आपली छाप सोडतो ती त्याच्या सुगंधाने. तो फुलतो जितक्या नम्रतेने त्याचा दरवळसुद्धा तितकाच विनयशील. कोमेजणंही तसंच राख झाली तरी चालेल, मात्र उधळण करायची ती सुगंधाचीच. चाफा त्याच्या अशा अव्यक्तपणातून खूप काही बोलून जातो. म्हणूनच कधी कधी वाटतं प्रेम करतानासुद्धा चाफ्यासारखं करावं, कुणालाच कसलीही इजा न करता अबोल त्याहूनही अव्यक्त कारण, निरपेक्ष प्रीतीची अनुभूती म्हणजे चाफा. म्हणूनच, सोनपिवळ्या रंगाच्या चाफ्याने भरलेली ओंजळ आज उगवत्या सूर्यासारखी भासते आहे. पहाटेची लाली विरघळून सूर्यकिरणात परावर्तित व्हावी तशीच ओंजळ गंधाळतेय. पूर्वान्हेच्या थंडगार वाऱ्याच्या झुळुकीसह चाफ्याचा गंध दरवळतोय. अवीट गोडी असलेल्या सुगंधाने मन प्रसन्न झालं.

आजचा चाफा नेहेमी पेक्षा वेगळा वाटतोय, कारण आज तो त्याच्या ईश्वर चरणी लीन झालाय. त्याच्या श्रद्धास्थानाजवळ नतमस्तक झालाय. चाफ्याच्या सुगंधाचं दान आज तुझ्यासाठी आहे. जिथं भक्ती, निष्ठा उगम पावते तिथं असते फक्त अमर्यादता. त्याच आवेगाने तो तुझ्याशी एकरूप झालाय. देवघरातील दिव्यापुढे नतमस्तक झाल्यावर मंद-मंद प्रकाशकिरण उजळतात, तसाच ओंजळीतला चाफा आज बहरलाय. अन चाफ्याचं दान करूनही रिती ओंजळ आता रिती नाही तर त्याच्या सुगंधाने ओसंडतेय...

**चाफा म्हणजे, निस्सीम भक्ती...**
**चाफा म्हणजे, निरपेक्ष अनुराग...**
**चाफा म्हणजे, निखळ सौंदर्य...**
**चाफा म्हणजे, दरवळ आठवणींचा...**
**चाफा म्हणजे, श्वास माझ्या जगण्याचा....**

माझ्या अंगणातला हा चाफा असाच बहरावा शेवटच्या श्वासापर्यंत माझ्या अन त्याच्याही...!

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगलवर कस्टमर केअर नंबर शोधू नका

गुगल हे जगातील सर्वात मोठे सर्च इंजिन आहे, जिथे जवळजवळ प्रत्येक प्रश्नाची उत्तरे मिळतात.




अनेकदा लोक बँक, कंपनी किंवा विभागाशी संबंधित माहितीसाठी गुगलवर कस्टमर केअर नंबर शोधतात, परंतु या प्रक्रियेत फसवणूक किंवा बनावट नंबर मिळण्याचा धोका असतो.

खरंतर गुगलवर उपलब्ध असलेला प्रत्येक नंबर बरोबर किंवा अधिकृत असायला हवा असं नाही. बऱ्याचदा सायबर गुन्हेगार गुगलवर बनावट ग्राहक क्रमांक टाकून लोकांना फसवतात आणि त्यांची बँक खाती रिकामी करतात. त्यामुळे कोणत्याही कंपनीचा कस्टमर केअर नंबर शोधताना खूप सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

गुगल त्यांच्या अल्गोरिथम, एसइओ (सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन) आणि जाहिरातींवर आधारित रँक केलेले ग्राहक सेवा क्रमांक वर दाखवते. हा देखील योग्य आणि अधिकृत ग्राहक सेवा क्रमांक असू शकतो, परंतु सायबर गुन्हेगार बनावट वेबसाइट्स आणि सशुल्क जाहिरातींद्वारे बनावट क्रमांक वर दाखवू शकतात.

ग्राहक कस्टमर केअर नंबरवर कॉल करतो, तेव्हा सायबर गुन्हेगार त्याला वेगवेगळ्या प्रकारे फसवण्याचा प्रयत्न करतात. बनावट ग्राहक सेवा प्रतिनिधींशी संपर्क साधला असता, ते खऱ्या कंपनीसारख्या दिसणाऱ्या बनावट वेबसाइट किंवा ॲप्सच्या लिंक्स पाठवतात. यामध्ये लॉग इन करून, तुमचे लॉगिन क्रेडेन्शियल्स स्कॅमर्सकडे जातात.

सायबर गुन्हेगार बँक अधिकारी असल्याचे भासवून वापरकर्त्यांच्या समस्या ऐकतात. यानंतर, ते मदतीच्या नावाखाली बँकिंग तपशील मागतात.

बनावट कस्टमर केअर एजंट तुम्हाला कोणतेही ॲप, मोबाईल, लॅपटॉप किंवा इंटरनेट समस्या सोडवण्याचे आमिष दाखवतात. त्यानंतर, ते तुम्हाला रिमोट ॲक्सेस ॲप (एनीडेस्क, टीमव्ह्यूअर) डाउनलोड करायला लावून डिव्हाइस हॅक करतात.स्कॅमर कॉल करणाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यासाठी दबाव आणतात, ज्यामुळे लोक त्यांची संवेदनशील माहिती घाईघाईने शेअर करतात.

खरे ग्राहक एजंट कधीही तुमची संवेदनशील माहिती विचारत नाहीत. जर कोणी विचारली तर समजून घ्या की तो एक फसवणूकीचा कॉल आहे.

# शास्त्रीय गायिका डॉ. प्रभा अत्रे

## निमित्त



डॉ. प्रभा दत्तात्रेय अत्रे या किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका होत्या. त्यांचा जन्म १३ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्यात झाला. डॉ. अत्रे यांनी भारतीय शास्त्रीय संगीत जागतिक स्तरावर लोकप्रिय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विजय करंदीकर, सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. त्यांनी संगीतामध्ये डॉक्टरेट मिळवली.

प्रभा अत्रे यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणही पुण्यातच झाले. त्यांचे वडील दत्तात्रेय पिलाजी अत्रे पुण्याच्या रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये हेडमास्तर होते. आई इंदिरा अत्रे त्याच शाळेमध्ये शिक्षिका होत्या. घरात गाण्याची परंपरा नव्हती, पण आईच्या आजारपणाचे निमित्त झाले व विरंगुळ्यासाठी हार्मोनिअम घरात आणण्यात आली. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण विजय करंदीकर यांच्याकडे झाले आणि त्यानंतर त्यांनी किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक सुरेशबाबू माने यांच्याकडे शिक्षण घेतले.

प्रभा अत्रेंना १९४८ ते १९५३पर्यंत सुरेशबाबूंकडून किराणा घराण्याची पद्धतशीर तालीम मिळाली. त्यांना सुरेशबाबूंच्या आकस्मिक निधनानंतर १९५५ ते १९५७ पर्यंत त्यांच्या भगिनी व ज्येष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना १९५५ साली केंद्र सरकारने शास्त्रीय संगीतासाठी जाहीर केलेली शिष्यवृत्ती मिळाली. पुढे १९५७ नंतरची त्यांची वाटचाल स्वचिंतनातून झाली. अमीर खाँ आणि बडे गुलाम अली खाँ यांच्या गायकीने त्यांना एक वेगळी नवी वाट दाखविली.

प्रभा अत्रे यांनी गांधर्व महाविद्यालयाच्या 'संगीत अलंकार' आणि 'संगीत प्रवीण' या पदव्या प्राप्त केल्या आहेत तसेच ट्रीनीटी कॉलेज ऑफ लंडन येथून त्यांनी वेस्टर्न म्युझिक थिअरी या विषयातही अभ्यास पूर्ण केला. ख्याल, तराणा, चतुरंग, टप्पा, ठुमरी, दादरा, भजन, गीत, गझल अशा वेगवेगळ्या संगीत प्रकारांत त्यांनी रचना केल्या आहेत. 'संगीत शारदा', 'विद्याहरण', 'संशयकल्लोळ', 'मृच्छकटिक' इ. नाटकांमधून त्यांना नावाजलेल्या नटांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. आकाशवाणीत साहाय्यक संगीत निर्माता म्हणून त्यांनी १९६० ते १९७० पर्यंत काम केले. त्यानंतर त्यांनी १९७९ ते १९९२पर्यंत मुंबईच्या श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठात संगीत विभाग प्रमुख म्हणूनही काम केले. गाण्याबरोबरच त्यांनी नृत्याचेही प्रशिक्षण घेतलं होतं. डॉ. अत्रे यांनी संगीत या विषयावर ११ पुस्तके लिहिली आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकी जपण्यासाठी त्यांनी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनची स्थापना केली होती. तसेच शास्त्रीय संगीताच्या अध्यापनासाठी त्यांनी स्वरमयी गुरुकुल या संस्थेची स्थापना केली होती.

प्रभा अत्रेंचे गाणे शांत, गंभीर, भावनेने ओथंबलेले व अतिशय बुद्धीप्रधान आहे. मींड आणि स्वरकणांचा विपुल प्रयोग, भावपूर्ण स्वर लगाव, शब्दांचे स्पष्ट सांगीतिक उच्चार, आलाप, ताना, सरगम मधील लालित्य, वैविध्य आणि नाविन्य सामान्य श्रोत्यालाही जाणवावे. कर्नाटक संगीतातील गमक आणि सरगम या माध्यमांतून हिंदुस्थानी संगीताला अधिक समृद्ध करण्यात प्रभा अत्रे यांचे मोठे योगदान आहे.

अत्रे यांना १९९० साली पद्मश्री तर २००२ साली पद्मभूषण या नागरी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले तसेच संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार मिळाले आहेत. अशा या ज्येष्ठ शास्त्रीय गायिकेचे १३ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# डोळ्यांचे आरोग्य सांभाळण्यासाठी 'हे' करा

आजकालच्या लाईफस्टाईलमध्ये गॅजेट्सचा वापर वाढला आहे. दिवसरात्र मोबाईल लॅपटॉपमध्ये राहिल्यामुळे डोळ्यांवर चुकीचा परिणाम होतो. ज्यामुळे नजर कमकुवत होते. कमी वयात डोळे कमकुवत होणं गंभीर स्थिती उद्भवण्याचं कारण ठरू शकते. नजर चांगली होण्यासाठी महागड्या ट्रिटमेंट्सचा आधार घ्यावा लागतो. दृष्टी वाढवण्यासाठी तुम्ही काही सोपे उपाय करू शकता.



अधुनिक जीवनशैली, दीर्घकाळ स्क्रिन वापरणे, अन्हेल्दी डाएट आणि ताण-तणाव यामुळे डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. आयुर्वेद आणि घरगुती घरगुती उपायांमध्ये याचे खास महत्व आहे. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी काळी मिरीचे मिश्रण आवश्यक असते. आयुर्वेदात एक प्रभावी उपाय आहे.

डोळ्यांसाठी तुपाचे फायदे : तूप भारतीय स्वंयपाकघरातील एक महत्वाचा घटक आहे. यात व्हिटामीन ए, डी, ई आणि के असते. शरीरातील पोषणाची कमतरता दूर होते आणि सेल्सचा विकास होण्यास मदत होते. तुपाचा वापर फक्त स्वंयपाकात केला जात नाही तर आरोग्याच्या कामांसाठीही केला जातो. आयुर्वेदात याच्या उपचारांमध्ये खास स्थान दिले गेले आहे.

डोळ्यांच्या विकासासासाठी काळी मिरीचे फायदे : काळी मिरीचा उपयोग आयुर्वेदात औषधी मसाल्यांच्या स्वरूपात केला जातो. यात पिपेरिन नावाचे तत्व असते ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहते. शरीराची इम्यूनिटी वाढण्यास मदत होते. पोषक तत्वांची कमतरता भासत नाही. व्हिटामीन ए डोळ्यांच्या आरोग्यांसाठी फायदेशीर ठरते. यामुळे रेटीनाची कार्यक्षमता वाढते आणि नाईट ब्लाईंडनेसचा त्रास उद्भवत नाही. तुपात योग्य प्रमाणात व्हिटामीन ए असते ज्यामुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. दीर्घकाळ स्क्रिनवर बसून काम केल्यानं डोळ्यांना थकवा येत नाही याशिवाय काळी मिरी खाल्ल्याने डोळ्यांची सूज आणि थकवा कमी होतो. या मिश्रणाने शरीराला पोषण मिळते याशिवाय चारही ठिकाणी ब्लड फ्लो व्यवस्थित होते. एक चमचा शुद्ध तुपात थोडी ताजी वाटलेली काळी मिरी मिसळा आणि रोज सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा. हे खाल्ल्यानंतर अर्धा तास काहीच खाऊ नका. यामुळे डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

# रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेला रिझर्व्ह बँकेने ठोठावला दंड

## अनुपालनातील त्रुटींबाबत दोन लाखांचा दंड



**अलिबाग : प्रतिनिधी**

संचालकांना कर्ज देणे व त्या कर्जांचे नुतनीकरण करताना बँकींग रेग्यूलेशन कायद्यातील तरतूदांचे उल्लघन केल्या प्रकरणी रिझर्व्ह बँकेने रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेला २ लाख १० हजार रुपयांचा आर्थिक दंड केला आहे. त्याबाबतचे प्रसिद्धी पत्रक रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केले आहे. ही कारवाई वैधानिक अनुपालनातील त्रुटींवर आधारित आहे. बँकेच्या दैनदिन व्यवहारावर याचा कुठलाही परिणाम होणार नसल्याचेही रिझर्व्ह बँकेकडून आपल्या प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेची वैधानिक तपासणी नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंटने (नाबार्ड) ३१ मार्च २०२४ रोजीच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने केली होती. या तपासणीत बँकने आपल्या संचालकांना कर्ज मंजूर करणे तसेच नुतनीकरण करताना बँकेकडून वैधानिक तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे समोर आले. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने रायगड जिल्हा मध्यमवर्ती बँकेला याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

ज्यावर बँकेकडून लेखी म्हणणे सादर करण्यात आले. यात अनियमितता आढळून आली. यानंतर रिझर्व्ह बँकेकडून ही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, महाराष्ट्र (बँक) वर २.१० लाख (रुपये दोन लाख दहा हजार) इतका आर्थिक दंड लावला आहे. हा दंड बँकेने बँकिंग रेग्युलेशन क्ट, १९४९ मधील कलम २० च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे लावण्यात आला आहे, असे रिझर्व बँकेने आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# श्रीवर्धनमध्ये ओजाळे पाखाडी परिसरात खड्डे बुजवण्यासाठी सुरुवात

**श्रीवर्धन : बातमीदार**

दरवर्षी दहीहंडी, गणेशोत्सव या सणांच्या अगोदर शहरातील सर्वच रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम नगर परिषदेकडून करण्यात येते. परंतु यावर्षी दहीहंडी गणेशोत्सव हे सण पार पडुन देखील काही दिवस उलटून गेले. त्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रशासनाला शहाणपण सुचले आहे व खड्डे भरण्याचे राहून गेलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी नगरपरिषदेने नुकतीच सुरुवात केली आहे.यावेळी फक्त गणेश विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजविण्यात आले होते. श्रीवर्धन शहरातील ओजाळे पाखाडी परिसरात श्रीवर्धन नगर परिषदेने पावसाळी केमिकल डांबर वापरून खड्डे वाजवण्याचे काम सुरू केले.



मात्र सदर खड्ड्यांमध्ये केमिकल युक्त डांबर व खडी टाकल्यानंतर त्यावरती पाणी टाकणे आवश्यक असते. परंतु खड्डे भरल्यानंतर त्या भरलेल्या खड्ड्यांवरती कोणत्याही प्रकारे पाणी टाकण्यात आले नाही. सध्या पाऊस देखील थांबलेला असल्यामुळे कडक ऊन पडत आहे. त्यामुळे हे भरलेले खड्डे किती काळ टिकतील याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे.

कारण केमिकल युक्त डांबर ही पाण्यामध्ये मिसळल्यानंतरच घट्ट बसते. परंतु सदर खड्ड्यांमध्ये पाणी नव्हते,आणि खड्डे भरणाऱ्यांकडे भरून झाल्यानंतर वरती टाकण्यासाठी पाणी ही नव्हते.

# ग्रामपंचायतीच्या विकासासोबतच मोठ्या रकमेची पारितोषिके मिळविण्याची संधी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राजकीय कारकिर्दीत अनेक सरपंच, सभापती, जिल्हा परिषद सदस्य व आमदार पाहिले. मात्र, जनतेचा विकास साध्य झाला नाही तर पदाचा कालावधी वाया जातो. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामुळे ग्रामपंचायतीच्या विकासासोबतच मोठया रकमेची पारितोषिके मिळविण्याची संधी प्राप्त झाली असून ग्रामपंचायतींनी या संधीचा लाभ घेऊन गावासाठी लोकसहभागातून मोठमोठया रकमेच्या बक्षिसांमधून विकासकामे करण्याची संधी साधावी, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व चंद्रकांत कळंबे यांनी केले.

पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेला सरपंच, उपसरपंच तसेच सदस्यांसह ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यशाळेप्रसंगी चंद्रकांत कळंबे बोलत होते. याप्रसंगी माजी राजिप सदस्या सुमन कुंभार, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, गटशिक्षण अधिकारी सुभाष साळुंखे, एकात्मिक बाल विकास सेवा योजना गोविंद फड, उपगट विकास अधिकारी हंबीर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांनी प्रास्ताविकामध्ये कार्यशाळेचा हेतू विषद केला. माजी राजिप सदस्या सुमन कुंभार यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. लोहारे सरपंच दीपक मनोहर पवार यांनी मनोगत व्यक्त केले.



राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनी, बक्षिसे मॅनेज करण्यापेक्षा ती लोकसहभागातून मिळविण्याची गरज असल्याचे स्पष्ट करताना पोलादपूर तालुक्याला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामध्ये राज्याचे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याची आठवण यावेळी करून देताना गावातील घंटा वाजविल्यानंतर ग्रामस्थ एकोप्याने देवळात जमत असत असा लोकसहभाग अपेक्षित असल्याचे या वेळी बोलताना सांगितले.

यावेळी कार्यशाळेच्या स्लाईडशो वेळी उपगटविकास अधिकारी हंबीर यांनी कार्यशाळेच्या स्वरुपाचे मार्गदर्शन केले. सुशासनयुक्त पंचायत, स्वच्छ व हरित गांव, नरेगा, ग्रामस्तरावर संस्था सक्षमीकरण, उपजिविका व सामाजिक न्याय, लोकसहभागातून, नाविन्यपूर्ण उपक्रम ५ लाखापासून ५०कोटींपर्यंत पारितोषिक प्राप्त करणे या अभियानात द्वारे शक्य आहे. तालुकास्तरीय पाच पुरस्कार मिळवता येणार आहेत. जिल्हा स्तरावर २५ लाख ते ५० लाख, विभाग स्तरावर २ कोटी ते ६० लाख अशी बक्षिसे आहेत. अभियानाच्या विविध निकषांचे लोकसंख्यानिहाय ग्रामपंचायत वर्गीकरण करण्यात आले असून अभियानांतर्गत लोकाभिमुख पंचायत, नागरी सेवा सुविधा केंद्र चर्चा, तक्रार निवारण, ग्रामपंचायत वेबसाईट, सीसीटीव्ही बसविणे, लेखापरीक्षण करणे, ग्रामसभा गणपूर्ती नोंदवही अद्यावत, धार्मिक स्थळ व पर्यटन सुशोभीकरण, उपजिविका विकास व सामाजिक न्याय मध्ये प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ व २, महिला बचत गट सहभाग उमेद अंतर्गत पात्र गट, कौशल्य विकास प्रशिक्षण, शेतकरी उत्पादक संघ, सामाजिक अर्थसहाय्य वंचित घटक पात्र लाभार्थी, अग्रीस्टक नोंदणी, जातीचे दाखले, लोकसहभाग व श्रमदानातील कामे, पाणंद रस्ते दुरुस्ती आदी निकषांचे स्पष्टीकरण उपगटविकास अधिकारी हंबीर यांनी केले.

धारवली सरपंच विलास सकपाळ यांनी, बक्षिसं म्हणजे मधाचे बोट आहे. मात्र काम करत ग्रामपंचायत विकास साधणे आवश्यक आहे. मात्र, ग्रामविकास अधिकारी कमी असल्याने सरपंच व गावाला योगदान मिळत नाही. जलजीवन मिशनची कामे निकृष्ट व अपूर्ण आहेत ती पूर्ण न झाल्यास अभियानात सहभाग निरुपयोगी ठरणार आहे, असे परखड मत मांडले योजनांचा अभियान आणि स्पर्धा यातून गावाला लोकसहभागातून सक्रीय करण्याची संधी मिळाली आहे.ग्रामसभेच्या गणपूर्तीची समस्या महिला बचतगटाच्या सदस्यांची मिटींग लावल्याने कायमची दूर झाल्याचे यावेळी सांगितले. संपूर्ण कार्यशाळेचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर उतेकर गुरूजींनी केले.

# कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना कीड व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना सतावत असलेल्या पिकांवरील विविध प्रकारचे कीड यांचा प्रतिबंध करण्यासाठी शेतकर्यांना मार्गदर्शन करणारे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात कर्जत तालुक्यातील ३५० हून अधिक शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप करण्यात आले. नागपूर येथील हिल इंडिया लिमिटेड आणि रायगड जिल्हा किसान क्रांती संघटना यांच्या माध्यमातून या शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह (आगरी समाज हॉल ) येथे शेतकरी प्रशिक्षण आणि सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या शेतकरी मेळाव्याचे उदघाटन किसान क्रांती संघटनेचे संस्थापक किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य. टी.एस. देशमुख , महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्था काटोल सचिव डॉ. सतीश ढोके, कृषी अधिकारी वंदना शिंदे, कर्जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुशांत पाटील, किसान क्रांती संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष उत्तम शेळके, डिशनल जनरल मॅनेजर अँड युनिटी हेड रसायनी डी. डी. सोनवणे, तालुका कृषी अधिकारी कर्जत राजाराम शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी खोपोली सुनील निंबाळकर, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक रायगड बुद्धभूषण मुनेश्वर, स्थानिक कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले, प्रवचनकार श्री शिवनाथ बाबा आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकऱ्यांना मागर्दशन करण्यासाठी कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेश कुमार कोळी, प्रगती लोकसंचालित साधन केंद्र मॅनेजर पद्मावती गायकवाड, आदिवासी विकास चॅरिटेबल ट्रस्ट कार्यालय नेरळ प्रमिला मसराम, मार्केटिंग ऑफिसर एच आय एल इंडिया (महाराष्ट्र) चंद्रकांत मिस्तरी, प्रोजेक्ट ऑफिसर महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्था काटोल प्रमोद बागडे आदी उपस्थित होते.

या शेतकरी मेळाव्यात उपस्थित असलेल्या ३५० हुन अधिक शेतकऱ्यांना शेती पूरक साहित्याचे वाटप करण्यात आले. कीटक शास्त्रज्ञांकडून शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले. हिल इंडिया लिमिटेड (भारत सरकार उपक्रम) महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्था काटोल जिल्हा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने एकात्मिक कीड व्यवस्थापनावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद बागडे यांनी केले. किसान क्रांती संघटनेचे जिल्हा संपर्क प्रमुख रामदास माळी, सुरेश खानविलकर, शरद तवले, अनिल गवळे, सचिव एकनाथ शेळके, खजिनदार रवींद्र जाधव, संघटक सुरेश राणे, काशिनाथ धुळे, पंढरीनाथ दाभाडे, साधुराम पाटील, सुरेश जाधव, अरुण शेळके यांच्या नियोजनातून हा कार्यक्रम यशस्वी झाला.



# पेणमध्ये साखरचौथ गणेश विसर्जनात भंडारा उधळत मिरवणूक

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशी साजरा करण्यात येणाऱ्या साखरचौथ गणेशोत्सवातील दीड दिवसांच्या गणेशमूर्तींची मिरवणूक पेणमध्ये मोठ्या उत्साहात झाली. या वेळी पेणचे आकर्षण समजल्या जाणाऱ्या मल्हार रुपातील कुंभार आळीच्या राजाची भंडारा उधळत थाटात मिरवणूक काढण्यात आली. तर पेणमधील इतर बाप्पांच्या मिरवणुकादेखील उत्साहात काढण्यात आल्या होत्या.



रायगड जिल्ह्यातील पेण, अलिबाग, उरण, पनवेलसारख्या ठिकाणी साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्यातच पेण शहरात याची जास्त क्रेझ पहायला मिळते. पेण तालुक्यातील हजारो तरुण गणेशमूर्तीकार वर्षभर गणपती मूर्ती बनवण्यात व्यस्त असल्याने गणेशोत्सव काळात त्यांना बाप्पाची मनोभावे हवी तशी पूजाअर्चा करता येत नाही. त्यामुळे पेणमध्ये अनंत चतुर्दशीपेक्षा साखरचौथ गणेशोत्सवाला अधिक महत्व दिले जाते.

यावर्षी श्री गणेश मित्र मंडळ कुंभार आळीच्या माध्यमातून जेजुरीच्या खंडेरायाची प्रतिकृती साकारून बाप्पाची भंडारा उधळत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गावर सर्वत्र भंडाऱ्याची उधळण झालेली दिसत होती. तर गुरव आळी मित्र मंडळाच्या माध्यमातून अघोरी कृत्याच्या खेळाचे सादरीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी अष्टविनायक मित्र मंडळ, ओरिजनल अष्टविनायक मित्र मंडळ,कोंडाळ तलाव, नरदास चाळ आदी बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

# मोरया मित्र मंडळाचा अकरावा गणेश विसर्जन सोहळा दिमाखात

## कार्यकर्त्यांसह नागरिकांचा उत्साह



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरातील साखर चौथ मोरया मित्र मंडळ शिव समर्थ नगर व मलखंडवाडीया नामवंत मंडळाचा गणेश विसर्जन सोहळा यावर्षी अतिशय दिमाखदार आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. मंडळाचा हा अकरावा वर्षाचा उत्सव असल्याने कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक यांच्यात विशेष उत्साह पाहायला मिळाला.

ढोल-ताशांच्या गजरात, झांजपथकाच्या तालावर, पारंपरिक वेशभूषेत सजलेले युवक-युवती, तसेच महिलांची उत्स्फूर्त उपस्थिती या सर्वांमुळे विसर्जन मिरवणूक रंगतदार ठरली. बाप्पाच्या मूर्तीला फुलांच्या सजावटीतून भक्तिभावाने मिरवणुकीत नेण्यात आले. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते.

नदीकाठी पोहोचल्यावर मंत्रोच्चार आणि आरती करून भक्तांनी बाप्पाला निरोप दिला. भाविकांच्या डोळ्यांत पाणी तर ओठांवर पुढच्या वर्षी लवकर या अशी प्रार्थना होती. श्रद्धा आणि जल्लोष यांचा संगम घडवत, मोरया मित्र मंडळाने या वर्षाचा उत्सव अविस्मरणीय ठरवला.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**

**जाहीर ई-निविदा सूचना**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प.क्र.४४७/४५८/२०२५ — दिनांक : १२/०९/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government Under Taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१४६/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड पनवेल येथे संत जगनाडे महाराज चौक ते उरण नाका (हमीद मुल्ला रोड) ते करंजाडे पुल (महानगरपालिका हद्द) पर्यंत पेव्हर ब्लॉकची दुरुस्ती करणे व नवीन पेव्हर ब्लॉक लावणे. | ३७,३०,४१८/- |
| २. | PMC/CE/१४७/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड पनवेल येथे पनवेल महानगरपालिका मुख्यालय ते एच.ओ.सी. कॉलनी ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ पर्यंत (ठाणा नाका रोड) पेव्हर ब्लॉकची दुरुस्ती करणे व नवीन पेव्हर ब्लॉक लावणे. | ३२,५५,९३३/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १५/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

# पनवेलमध्ये डेंग्यू-मलेरियाची साथ

## अनेक जण आजारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात डेंग्यू-मलेरियाची साथ असून अनेक जण आजारी आहेत. त्यामुळे खासगी रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे.

पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून पनवेल तालुक्यात नागरिक आजारी पडण्याची संख्या वाढू लागली आहे. मलेरिया, डेंग्यू आणि इतर आजारातील रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. त्यामुळे खाजगी रुग्णालयात नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. घरातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यास संपूर्ण कुटुंबच आजारी पडत आहे. त्यात लहान मुलांना याचा अधिक त्रास होतो. पनवेल पंचायत समितीमार्फत आरोग्य विभागाने तालुक्यातील जुलै महिन्यात आठ हजार ५९२ जणांची तपासणी केली यात ९८ जणांना मलेरिया झाला तर ४० जणांना डेंगू झाला. ऑगस्ट महिन्यात मलेरियाचे सहा हजार ६५५ जणांची तपासणी केली यात ९२ रुग्णांना मलेरिया झाला तर २१ जणांना डेंगू झाला. सहा सप्टेंबर पर्यंत १ हजार ४४ जणांची तपासणी करण्यात आली असून यातील ११ जणांना मलेरिया झाला आहे. त्यामुळे मलेरिया होण्याचे प्रमाण वाढू लागले असल्याचे दिसत आहे.



मच्छरांचे प्रमाण वाढू लागल्याने ग्रामपंचायतीने फवारणी करणे गरजेचे आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक आणि सरपंचाने गावांमध्ये मच्छर फवारणी करावी. रुग्ण संख्या वाढू लागल्याने काही डॉक्टर याचा फायदा घेत असल्याचे समोर आले आहे. फ्री डेमो साठी येत असलेल्या गोळ्या देखील काही डॉक्टर आदिवासी बांधवांना विकत असल्याच्या तक्रारीत वाढ होत आहे.

# वाशी येथे आज पुनर्विकास परिषद

**नवी मुंबई : बातमीदार**

सहकार भारती, विकास इंडिया ट्रस्ट आगि नवी मुंबई हौसिंग फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पुनर्विकास परिषदचे आयोजन शनिवार १३ सप्टेबर रोजी सकाळी १०.३० वाजता विणुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे करण्यात आले आहे.

नाबार्डचे व रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, गृहनिर्माण सल्लागार समितीचे अध्यक्ष राजेद्र मिरगणे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दोन सत्रात होणाऱ्या ' पुनर्विकास परिषदेच्या पहिल्या सत्रात गणेश नाईक आणि सतीश मराठे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे तर दुसऱ्या सत्रात राज्य पुनर्वसन धोरण संदर्भात भास्कर म्हात्रे हे मार्गदर्शन करणार अ‍ॅड. श्रीप्रसाद परब' हे कायदेशीर मार्गदर्शन करणार आहेत. पुनर्वसन परिषदेचे निमंत्रक सहकार भारतीचे प्रदेश अध्यक्ष दत्ता रामजी चाळके, महा मंत्री विवेक जुगादे, सहकार भरतीचे अध्यक्ष प्रमोद जोशी, विकास इंडिया ट्रस्टचे अध्यक्ष विकास शाहूराज पाटील, महामंत्री संतोष मिसाळ अणि अध्यक्षा श्रीमती त्रिवेणी सालकर उपस्थिती राहणार आहेत.

नवी मुंबईतील सिडकोच्या घरांचा पुनर्विकासाचा प्रश्न सोडविण्यासाठी तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन महत्वाचे ठरत असल्याने, विविध सामाजिक संस्था अणि राजकीय पक्ष यांच्या कडून, पुनर्विकासबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात ' येत आहे. सहकार भारती, विकास इंडिया ट्रस्ट आणि नवी मुंबई हौसिंग फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुनर्विकास परिषद साठी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे,नाबार्डचे संचालक सतीश मराठे, गृहनिर्माण सल्लागार समितीचे अध्यक्ष राजेद्र मिरगणे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# गव्हाण येथे माझे विद्यालय माझा स्वाभिमान उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परीषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या आदेशान्वये रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'हमारा (माझे) विद्यालय हमारा (माझा) स्वाभिमान' हा संस्कारक्षम व प्रेरणादायी उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.



रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील गव्हाण शाखेत नेहमीच नवोपक्रम साजरे होत असतात. सर्वच शासकीय उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालय नेहमीच अग्रेसर असते. राज्योत्सव अर्थात गणेशोत्सवाच्या सुट्टीनंतर लगेच दुसऱ्या दिवशी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे आणि पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांच्या नेटक्या नियोजात देशभक्तीने ओतप्रोत वैविध्यपूर्ण कृतीशील कार्यक्रमांनी मंगळवार दि.९ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात हा संस्कारक्षम आणि प्रेरणादायी उपक्रम हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेले विविध वेशभूषेतील क्रांतिकारक देशभक्तांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी मर्मभेदी संवादातून राष्ट्रप्रेमी वातावरण निर्मिती केली. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सहावी व सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध शारिरिक हालचालींचे लयबद्ध सामुदायिक कवायत प्रकार केले.

इयत्ता सहावी अ च्या विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहाने झाडू, सुफली आणि कचराकुंडी इ.साधनांच्या सहाय्याने शालेय परिसरात स्वच्छता मोहिम राबविली. इयत्ता सातवी ब आणि क च्या विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनांतर्गत बागकाम केले.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी सर्व उपक्रमशील विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे यांचेसह प्रतिज्ञा घरत, माधुरी म्हात्रे, संपदा म्हात्रे, विशांत ठाकूर, प्रमोद करावकर, सुजाता शेलार, दर्शना माळी, वृषाली म्हात्रे, विद्या पाटील, गीतांजली म्हात्रे, शितलकुमार म्हात्रे, चारुशीला ठाकूर, प्रशांत परदेशी यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन हर्षला पाटील यांनी मानले.



**नवीन पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका सुशीला जगदीश घरत यांच्या गौरा गणपतीचे भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले.**



**उरण : विंधणे गावचे भाजपचे नेते प्रसाद पाटील व उरण पंचायत समिती माजी सदस्य दिशा पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गौरा गणपतीचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, उरण शहर संपर्क प्रमुख करण ठाकूर आदींनी दर्शन घेतले.**



**पनवेल : तालुक्यातील शिरढोण येथील डायमंड मित्र मंडळाचा गौरा गणपती.**

# वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र संस्थेचा उद्या हितचिंतक मेळावा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरीक संघाचे सभागृह, ठाणा नाका मार्ग पनवेल येथे रविवारी (दि.१४) दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत पनवेल परिसरातील वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र या संस्थेचा 'हितचिंतक मेळावा' आयोजित करण्यात आला आहे .

जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी रायगड जिल्हयामध्ये वनवासी कल्याण आश्रम या संस्थेचे कार्य १९७९ पासून सुरू आहे. शिक्षण, खेलकुद, आरोग्य, उद्योग तसेच महिला सबलिकरण व सक्षमिकरण या आयामा च्याव्दारे संस्था जिल्हातील जवळपास ५०० पाड्यांमध्ये काम करीत आहे. या कार्यासाठी आर्थिक, वस्तुस्वरूपात तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वेळ देऊन अनेक समाज बांधव, संस्था सढळ हस्ते मदत करीत असता त्यांचा हितचिंतक मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास युट्यूब चॅनलचे संपादक सुशील कुळकर्णी हे मतांतरण आणि वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर समिती अश्विनी मुळे अध्यक्ष, सुवर्णा वत्सराज सचिव, सुरेंद्र गाडगीळ सहसचिव, जिल्ह्या समिती - कुलाबा, अविनाश म्हात्रे अध्यक्ष, उदय टिळक उपाध्यक्ष,रविंद्र पाटील सचिव तसेच माजी विद्यार्थी, चिंचवली विद्यार्थी वसतीगृह, पनवेल हे अथक मेहनत घेत आहेत.

# नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, सह शालेय समिती विभागातर्फे गुरुवारी (दि.११) संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.





या स्पर्धेसाठी संस्थेचे कार्यकारणी सदस्य अ‍ॅड.राहुल घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर या स्पर्धेसाठी मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, वैशाली पारधी तसेच शिक्षक व स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे राहुल घरत यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा देताना आपला आत्मविश्वास. संवाद कौशल्य तसेच आपल्या वक्तृत्वातून संदेश देण्याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उच्च माध्यमिक विभागातील कला वाणिज्य विज्ञान विभागातील ८६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सामाजिक आणि राजकीय सुधारणा क्षेत्रातील अमूल्य कामगिरी व लोकनेते रामशेठ ठाकूर युवकांसाठी आदर्श व्यक्तिमत्व या दोन विषयांवर विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी व इंग्रजी भाषेत आपले विचार व्यक्त केले. मराठी भाषेसाठी परीक्षक म्हणून सहशिक्षक बाळासाहेब बडे, निखिलेश देशमुख, हिंदी भाषेसाठी साईनाथ पाटील व संगीता देशमुख तर इंग्रजी भाषेसाठी आत्तम आवटे व कपिल दांडगे यांनी काम पाहिले. तर सहशिक्षिका सविता सावंत यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

# फळांच्या दरात घसरण

## ग्राहकांना दिलासा

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या काळात फळांच्या मागणीत मोठी वाढ झाल्याने भाव गगनाला भिडले होते, परंतु आता फळांच्या भावात तब्बल २० ते २५ टक्क्यांची घसरण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

गणेशोत्सवात पूजा-अर्चा, प्रसाद व पाहुणचार यासाठी मोठ्या प्रमाणावर फळांची खरेदी केली जाते. त्यामुळे या कालावधीत सफरचंद, संत्री, मोसंबी, सिताफळ आदी फळांचे भाव झपाट्याने वाढले होते. पनवेल मधील घाऊक बाजारात सफरचंदांचा भाव तब्बल ८० ते १३० रुपये किलोपर्यंत गेला होता, मात्र सण संपल्यानंतर भाव कमी होऊन सध्या ७० ते ११० रुपये किलोवर आला आहे.

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीतील घाऊक फळ बाजारात रोज सरासरी साडेतीन ते चार हजार क्विंटल सफरचंद, पाचशे क्विंटल संत्री व दीड हजार क्विंटल सिताफळाची आवक होत आहे, मात्र सध्या पावसाच्या संततधारेमुळे ग्राहकांनी बाजारपेठेकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे मागणीत मोठी घट झाल्याने भाव खाली आले असल्याचे फळ व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

गणेशोत्सवामुळे बाजारात काही प्रमाणात उभारी आली होती, मात्र सण संपल्यानंतरही आवक सुरू असली तरी विक्रीत मंदी जाणवत आहे. घाऊक बाजारात भाव घसरले असले तरी किरकोळ बाजारात मात्र ग्राहकांना चढे भाव मोजावे लागत आहेत.



**किरकोळ बाजार भाव**

*पेरू ६० रुपये गणेशोत्सवापूर्वी १००*
*डाळिंब १८० पूर्वी २२०*
*सफरचंद १५० पूर्वी २००*
*पपई ६० पूर्वी ७०*
*सीताफळ १४० पूर्वी १८०*

# उरण मोरा येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**उरण : वार्ताहर**

सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन, मुंबई यांच्या वाशी परिमंडळाच्या वतीने जे. एम.म्हात्रे प्राथमिक शाळा मोरा व न्यू इंग्लिश स्कूल, मोरा उरण येथील पहिली ते दहावी पर्यंतच्या २०० गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना २०० स्कूल बॅग, १२,००० वह्या, २०० पुस्तके, २०० कंपास बॉक्स (संपूर्ण साहित्य - पेन्सिल, खोडरबर, शार्पनर इ.) मुलांसाठी खाऊ, चॉकलेट्स, कॅडबरी व इतर वस्तू देण्यांत आल्या.

या वेळी सब ऑर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशनचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक संजय ठाकूर, लक्ष्मण राठोड, नारायण चकोर, श्रीनिवास बोबडे, दादासाहेब दाईंगडे, दिनेश बागुल, जितेंद्र साबळे, निखिल पाटील, आशिष इंगळे, संजित करांडे, कुलदीपसिंग राजपूत आदी परिमंडळ सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य मिळवून देण्यासाठी शाळेच्या माजी विद्यार्थिनी रुपाली रुमडे व सहा.शिक्षक अनिल पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमास माध्यमिकचे चेअरमन पी.एम कोळी, प्राथमिकचे चेअरमन चंद्रकांत कोळी, माध्यमिकचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, मनोज म्हात्रे, स्वप्नील नागमोती, रोहिणी घरत, सुनिता पाटील, सौ सुप्रिया मुंबईकर, सत्यवान मर्चंडे, रुपाली चौधरी, कोल्हे मॅडम, राणी कदम विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सजावट घनश्याम म्हात्रे, दिनेश पाटील, ममता गवस यांनी केली. सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले आभार सहाय्यक शिक्षक साईनाथ गावंड यांनी केले. अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपला, असे जाहीर करण्यात आले.

# गव्हाण विद्यालयास क्रीडा गणवेशासाठी वैभव घरत यांचेकडून ४० हजारांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मधील शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी खेळाडूंच्या क्रीडा गणवेशासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी, पालक प्रतिनिधी आणि खारकोपर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष युवा नेते वैभव तुळशीदास घरत यांच्याकडून बुधवारी (दि.१०) ४०००० रुपये देणगी देण्यात आली.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांचेकडून प्रेरणादायी वारसा...**



विद्यालयाचे आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाचा प्रेरणादायी वारसा समृद्ध करणारी युवा पिढी घडत आहे याचे विद्यालयास अप्रूप असल्याचे प्रतिपादन सेवकवृंदाकडून करण्यात आले.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने पनवेल तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेस आजपासून (दि.११) प्रारंभ होत असून विद्यालयाच्या सर्व सहभागी खेळाडूंमध्ये पोषक खिलाडूवृत्तीची जोपासना व एकात्मिक संघभावना वृद्धिंगत होवून शिस्त,अभिमान व आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी शालेय क्रीडा गणेवाशामुळे प्रोत्साहन मिळावे ह्या सद्हेतुने विद्यालयाचे माजी विद्यार्थी व पालक प्रतिनिधी वैभव तुळशीदास घरत यांनी विद्यालयाच्या १०० खेळाडूंना क्रीडा गणवेशासाठी चाळीस हजार रुपयांचा धनादेश विद्यालयाच्या प्राचार्या जोत्स्ना ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला.

या वेळी भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, शुभांगी वैभव घरत तसेच विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे आणि विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आदी उपस्थित होते.

वैभव घरत यांचे दातृत्वा प्रित्यर्थ कृतज्ञतापूर्वक अभिनंदन करण्यात येवून विद्यालयाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# टॉरेंट प्रकल्पात धक्कादायक प्रकार

## गौरकामत येथील वनविभागाच्या जागेत बेकायदेशीर तंबू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील गौरकामत येथे टॉरेंट PSH ३ प्रा. लि. कंपनीचा साई डोंगर-१ पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. तब्बल १३,०१७ कोटी रुपयांचा खर्च आणि २३३ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पासाठी गाठण्यात येणार आहे. प्रकल्प अद्याप चौकशी व पर्यावरणीय सुनावणीच्या टप्प्यात असतानाही कंपनीकडून थेट वनविभागाच्या जागेत बेकायदेशीर काम सुरू झाल्याचे आता उघड झाले आहे.

नुकताच प्रकल्प अधिकारी आणि प्रशासन तसेच ग्रामस्थांच्या उपस्थित कर्जत तालुक्यातील गौरकामत येथे पर्यावरण जनसुनावणी घेण्यात आली होती, मात्र ग्रामस्थानी प्रकल्पाला थेट विरोध दर्शवत सुनावणीवर बहिष्कार टाकला होता. त्यामुळे प्रकल्प उभा राहणार या विरोधातच रान पटेल असेच चित्र तयार होत असताना, ग्रामस्थांच्या निदर्शनास आले की, कंपनीच्या कामगारांनी वनविभागाच्या जमिनीवर तंबू ठोकून तळ ठोकला आहे. या घटनेचे थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यात वनक्षेत्रात बेकायदेशीर तंबू ठोकलेले स्पष्ट दिसत असून कामगार तेथे राहत आहेत, त्यामुळेकायदे केवळ सामान्य नागरिकांसाठीच आहेत का? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.



याहून गंभीर म्हणजे, दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये लहान चिमुरड्यांना कामे करताना स्पष्ट दिसत आहे. शाळेत जाण्याच्या वयात या मुलांना दगड उचलणे, सामान वाहून नेणे अशा कामांत राबवले जात आहे.बालकामगार कायद्याने गुन्हा असताना खुलेआम हा प्रकार घडत असून, प्रशासन डोळेझाक का करत आहे? असा थेट प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला.

सदर प्रकरण व्हायरल झाल्यानंतर वनविभागाचे काही कर्मचारी पाहणीसाठी घटनास्थळी पोहोचले. याच डोंगर जंगल भागात आणखी काही बेकायदेशीर तंबू ठोकण्यात आलेले असून प्रशासन याकडे डोळेझाक करून असल्याचे सांगण्यात येते.सामान्य माणसाला वनक्षेत्रात झोपडी बांधायला परवानगी नाही, पण कंपनीला मात्र जंगलात तंबू ठोकण्याची मोकळीक कोणत्या आधारावर? बालकामगार कामाला लावणे म्हणजे थेट कायद्याची थट्टा आहे. तरीही प्रशासन आणि वनविभाग गप्प का?

ग्रामस्थांनी आधीच या प्रकल्पाविरोधात सुनावणी बहिष्कृत केली होती.कंपनी, प्रशासन आणि वनविभाग संगनमताने जनतेच्या हक्कांवर गदा आणत आहेत. तहसीलदार,पोलिस प्रशासन,वनविभाग यांचे दुर्लक्ष होत असून कायदे केवळ गरीबांसाठी आणि नियम केवळ सामान्यांसाठी? असा थेट सवाल जनतेतून होत आहे.

# अवघड वळणावर कंटेनर बंद पडल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात

## माणगाव पुणे मार्गावर अपघाताची शक्यता वाढली



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ते कोस्ते बुद्रुक या दरम्यानच्या मार्गावर जेटीएल प्रा. लि. कंपनीसाठी अवजड कंटेनर वाहतूक केली जाते. हे कंटेनर कॉइन घेऊन जाणारे असून त्यांची सततची वाहतूक स्थानिक नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. अरुंद रस्ता, अवघड वळणे आणि खराब देखभालीमुळे हे कंटेनर अनेकदा मध्य रस्त्यात बंद पडतात. परिणामी या मार्गावरून जाणारी येणारी संपूर्ण वाहतूक ठप्प होते त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होतो.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावर दररोज अनेक वेळा अशी परिस्थिती निर्माण होते. कंटेनर बंद पडल्यामुळे छोट्या वाहनांसह शालेय बसेस आणि रुग्णवाहिकांनाही अडथळा निर्माण होतो. आपत्कालीन सेवांना वेळेवर पोहोचणे कठीण बनते. ही सततची समस्या स्थानिकांच्या जीवनाला धोक्यात टाकत असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याबाबत जेटीएल कंपनीने नादुरुस्त वाहने वापरण्यास बंदी घालावी अशी मागणी होत आहे. तसेच संबंधितांनी योग्य दुरुस्ती करून कंटेनर वाहने व्यवस्थित रस्त्यावर पाठवावेत, या मार्गावर सतत कंटेनर अवघड वळणावर पलटी होतात किंवा बिघडतात. हा रस्ता मुळात अरुंद असल्याने व अवघड वळणाचा असल्याने येथे कंटेनर आल्यावर पलटी होतात तर कांही बिघडतात. या गंभीर प्रश्नाकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे. वाहन बंद पडले अथवा अपघात झाल्यास या रस्त्यावर ताबडतोब वाहतूक कोंडी होते.

दिघी पोर्ट माणगाव निजामपूर पुणे बेंगलोर हा सतत वाहतुकीचा मार्ग असल्याने या रहदारीच्या मार्गावर एखादे वाहन बंद पडल्यास आगरा अपघात झाल्यास ताबडतोब त्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते. या मार्गावरील वाहतूक कोंडी आणि अपघात टाळण्यासाठी कोणताही ठोस बंदोबस्त केला जात नाही.

## आज जावळी विद्यालयात संरक्षक भिंत व प्रसाधनगृह कामाचे भूमीपूजन

**माणगाव: प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचालित इंग्लिश स्कुल जावळी या विद्यालयाकरिता रायगड - रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांच्या अथक प्रयत्नाने मंजूर झालेल्या संरक्षक भिंत व विद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींचे प्रसाधनगृह या कामाचा भूमिपूजन समारंभ आज शनिवार दि. १३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

इंग्लिश स्कुल जावळी येथे सकाळी ९ : ३० वा. खा.सुनील तटकरे यांच्याहस्ते व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच माजी आ.अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावेअसेआवाह श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ जावळी अध्यक्ष व संचालक मंडळ, लोणशी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी केले आहे.

# पोस्को महाराष्ट्र स्टीलतर्फे शेतकऱ्यांचा अभिनव फार्मर्स क्लब पुणे येथे अभ्यासदौरा

**माणगाव: प्रतिनिधी ,वार्ताहर**

पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, दि. १२ ऑगस्ट व दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी गोरेगांव आणि इंदापूर विभागातील प्रगतशील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा पुणे येथील अभिनव फार्मर्स क्लब येथे आयोजित करण्यात आला.

या अभ्यास दौर्याचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना नव्या शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे, शेतकऱ्यांना रासायनिक खत वापराकडून सेंद्रिय शेतीकडे वळवणे तसेच त्यांच्या उत्पन्नात आणि उत्पादनात वाढ कशी करावी याची माहिती देणे हा होता. पहिल्या टप्प्यात कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती माणगांव यांनी निवडलेले १६ प्रगतिशील शेतकरी सहभागी झाले, तर दुसऱ्या टप्प्यात माणगांव मधील रायगडचा शेतकरी राजा एफपीओ मधील १४ शेतकरी सहभागी झाले. यात ८ महिला शेतकऱ्यांचाही समावेश होता.

अभिनव फार्मर्स क्लब हा सेंद्रिय शेतीचा अग्रणी असून, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रसार करण्याचे मार्गदर्शन येथे केले जाते. या दौर्यात शेतकऱ्यांना पॉलीहाऊस तंत्रज्ञान, सेंद्रिय खतांचा वापर, रासायनिक खतांचा वापर कमी करून उत्पादनात वाढ कशी करावी



याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एक एकर शेतीत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादन वाढविण्याचे मॉडेलही शेतकऱ्यांना दाखवण्यात आले. अभिनव फार्मर्स क्लबचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर बोडके यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत सेंद्रिय शेती व बाजारपेठेत उत्पादनाला चांगला भाव मिळविण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. फक्त पिकवून चालत नाही, तर ते कुठे आणि कसे विकायचे हे समजणे देखील महत्त्वाचे आहे, या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक शेतीत सुधारणा करून नवीन तंत्रज्ञान अवलंबण्याचीनवी दिशा मिळाली. त्यांनी जमिनीच्या गुणवत्तेत सुधारणा कशी करावी, सेंद्रिय शेतीला चांगला प्रतिसाद कसा मिळवावा व उत्पादनाला बाजारपेठेत चांगला भाव कसा मिळेल याबाबत मार्गदर्शन मिळाले.

# भाताचे शिवार फुलल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर उत्साह

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील भातशेतीचे शिवार फुलायला लागला असून भाताचे कणीस बाहेर पडून शिवार पिवळे रंग परिधान करू लागला असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पहावयास मिळत आहे तसेच दोन दिवसांपासून पावसाचे प्रमाण कमी झाल्याने शेतकऱ्यांना एक आधार निर्माण झाला आहे.आता भातशेतीला दिवसातून एखादी सर चालेल परंतु जास्त पाऊस पडला तर नुकसान होण्याचा धोका आहे.

तालुक्यातील विविध भागात अंदाजे १२०० हेक्टर क्षेत्रावर भातशेतीची लागवड केली असून वरकसजमीन क्षेत्र अधिक आहे. यावर्षी अनेक शेतकऱ्यांनी भातशेती लागवडीचे आधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञान कृषी विभाग व कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली आवगत करुन एस.आर.टी.पध्दत, सामुहिक शेती व तंत्रज्ञान, यांत्रिक पद्धतीने भातशेतीची लागवड केली आहे. त्याचा एक चांगला फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. यावर्षी तालुक्यातील या वर्षी शेतीसाठी पडलेला पाऊस हा चांगला शेतीयोग्य पडल्याचे शेतकरी वर्गातून सांगितले जात आहे. त्यामुळे भाताचे कणीस अंदाजे ५० टक्के च्यावर शेतीमध्ये बाहेर पडला आहे. कणसातील दाणे भरण्याची भाताची प्रक्रिया सुरू असून कणीस पिवळे व दाणेदार होत आहे.काही काळावधीत शेती पिवळी होऊन कापणी योग्य होईल.



यावर्षी भातशेती चांगली असून भाताचे उत्पादन मागील वर्षापेक्षा वाढेल. भात शेती चांगली आहे. फक्त अखेरच्या क्षणी कापणी, बांधणी, झोडणीच्या वेळी अवकाळी पाऊस पडूनये यावर्षीचा भातशेतीचा हंगाम चांगला असून शिवार फुलत असल्याने उत्पन्न चांगले मिळेल.



**माणगाव : परेश विठोबा अंधेरे यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मंत्री भरत गोगावले यांनी त्यांचे अभिनंदन केले.**

# साखर चौथीच्या गणपतीला भावपूर्ण निरोप

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात साखर चौथीच्या बाप्पाला पारंपारिक पध्दतीने भावपूर्ण निरोप.तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व विद्याशाखेच्या वतीने आयोजित साखरचौथ गणपती उत्सव २०२५ अतिशय दिमाखदार व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरा यांचा उत्तम संगम पाहायला मिळाला. बुधवार दिनांक १० सप्टेंबर रोजी गो म वेदक विद्यामंदिरात सकाळी विधीवत पूजाकरून आरती करण्यात आली. दुपारी सुहास भोईर व विद्यार्थ्यांनी भजन सादर केले. नंतर सांस्कृतिक कार्यक्रम, सायंकाळी सर्व विद्याशाखा कर्मचारी व विद्यार्थ्यांचे फनी गेम्स व संगीत खुर्ची, रात्री सर्व विद्याशाखा कर्मचारी, विद्यार्थी व भोईरवाडी मंडळाचे भजन, गुरुवार ११ सप्टेंबर रोजी सकाळी मुख्याध्यापक दिलीप ढाकणे यांच्या हस्ते विधिवत पूजा नंतर कॅरम व बुद्धिबळ, विद्याशाखा कर्मचारी व विद्यार्थ्यांचे कविता वाचन, अभंग गायन, अभिनय सादरीकरण, या दरम्यान स्पर्धांनमधील गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेश देशमुख,शाळा समिती चेअरमन महेंद्र कजबजे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, आदि मान्यवरवरांचे हस्ते सन्मानित करणेत आले .दुपारनंतर गणपतीची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली





## रेवदंडा समुद्रकिनाऱ्यावर बंदी असतानाही नेले चारचाकी वाहन; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

समुद्र बीचवर चारचाकी वाहन नेण्यास बंदी असताना, रेवदंडा समुद्र बिचवर चारचाकी वाहन चालविले, या प्रकरणी रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

रेवदंडा बीच येथे दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी बाराचे सुमारास यश राजेंद्र मेहता वय २६ वर्षे , राहणार ओलेम मरवे रोड, मालाड, मुंबई यांनी ऍस्टर गाडी नं. एम.एच. ४७ बीटी ५६९४ हे चारचाकी वाहन रेवदंडा समुद बीचवर बेदरकारपणे आतमध्ये खोलवर समुद्राचा वाळूवर चालवून स्वतः चे व पायी चालत असलेल्या पर्यटकांचे जीवीतास धोका निर्माण होईल असे हयगयीचे कृत्य केले. शिवाय हे वाहन वाळूत रूतलेल्या स्थितीत समुद्र पाण्यात आढळून आले. याबाबत पोलिस हवालदार सुधीर पाटील यांनी रेवदंडा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सदर बाबत रेवदंडा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोलिस नाईक एस.ए. गव्हाणे हे करत आहेत.

# श्रीवर्धनमधील सर्व ग्रामपंचायती आदर्श व समृद्ध करुया -प्रांताधिकारी पाटील

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील सर्व ४३ ग्रामपंचायतींना आदर्श आणि समृद्ध बनवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शासनाचे प्रतिनिधी म्हणून आपण चोख काम करायचे आहे, कोणतीही ग्रामपंचायत कमी पडता कामा नये. कोणीही कसूर करणार नाही याची दक्षता घ्यावी, असे थेट आवाहन प्रांताधिकारी महेश पाटील यांनी केले.



१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत हे अभियान तालुक्यात राबवले जाणार असून, त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले.शुक्रवार दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती सभागृहात तालुका स्तरीय एकदिवशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, पालक अधिकारी तसेच केंद्र चालक यांनी हजेरी लावली.

या प्रसंगी माजी सभापती प्रशांतशिंदे, गटविकास अधिकारी माधव जाधव, प्रशासन अधिकारी गणेश गिते, पंचायत समिती विस्तार अधिकारी किशोर नागे, महसूल व जिल्हा परिषदेचे अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख, ग्रामसेवक तसेच विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शेतकऱ्यांना शाश्वत शेती पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व सिंचन सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे सुदृढ करणे, महिलांसाठी व बालकांसाठी आरोग्य सुविधा वाढवणे, शाळा दुरुस्ती, डिजिटल शिक्षण सुविधा, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, लहान मुलांच्या पोषण व शिक्षणासाठी अंगणवाड्यांचे सक्षमीकरण,सर्व स्तरांवर पारदर्शक व सक्षम प्रशासन, स्मशानभूमी, व्यायामशाळा व धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण

तसेच महसूल विभागामार्फत जिवंत सातबारा मोहीम राबवली जाणार असून, सातबारावर जुनी नावे कायम असणाऱ्या नागरिकांची नावे दुरुस्त करणे, सातबारा-आधार कार्ड लिंक करणे या उपक्रमावर भर देण्यात येईल.ग्रामपंचायतींच्या विकासासाठी वर्षातून चार ग्रामसेवा सभा घेणे आवश्यक आहे.

# बांगलादेशाची विजयी सलामी!

## लिटन दासच्या अर्धशतकाच्या बळावर हाँगकाँगचा हिशोब बरोबर



**अबुदाबी : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट टीमने अफगाणिस्तान, टीम इंडियानंतर आशिया कप २०२५ स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे. आशिया कप स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात बांगलादेशने हाँगकाँगवर ७ विकेट्सने मात केली. हाँगकाँगने बागंलादेशसमोर १४४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. बांगलादेशने हे आव्हान १४ बॉलआधी आणि ३ विकेट्स गमावून पूर्ण केलं. बांगलादेशने १७.४ ओव्हरमध्ये १४४ धावा केल्या आणि विजय मिळवला. बांगलादेशच्या या विजयात कॅप्टन लिटन दास याने प्रमुख भूमिका बजावली. लिटन दास याने सर्वाधिक ५९ धावा केल्या. तर तॉहिद हृदॉय याने लिटनला चांगली साथ दिली.

बांगलादेशची विजयी धावांचा पाठलाग करता ठिकठाक सुरुवात झाली, मात्र हाँगकाँगने बांगलादेशला ठराविक अंतराने २ झटके दिले. परवेझ इमोन १९ आणि तांझिज तमिम याने १४ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. त्यामुळे बांगलादेशचा स्कोअर २ आऊट ४७ असा झाला. त्यानंतर लिटन दास आणि तॉहिद हृदॉय या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी करत बांगलादेशचा विजय निश्चित केला. हाँगकाँगने या भागीदारी दरम्यान जोडीला चांगलाच घाम फोडला. मात्र त्याचा फार परिणाम झाला नाही. बांगलादेश विजयाच्या उंबरठ्यावर असताना लिटन आणि तॉहिद ही जोडी हाँगकाँगने फोडली. लिटन आऊट झाला.

लिटन दास याने ३९ बॉलमध्ये १५१.२८ च्या स्ट्राईक रेटने ५९ रन्स केल्या. लिटनने या खेळीत १ सिक्स आणि ६ फोर लगावले. त्यानंतर तॉहिदने उर्वरित २ धावा करुन बांगलादेशला विजयी केलं. तॉहिदने ३६ बॉलमध्ये १ फोरसह नॉट आऊट ३५ रन्स केल्या. हाँगकाँगसाठी आतिक इक्बाल याने २ विकेट्स मिळवल्या. तर आयुष शुक्ला याने १ विकेट मिळवली. बांगलादेशने या विजयासह ११ वर्षांपूर्वीचा एक हिशोब बरोबर केला. बांगलादेश विरुद्ध हाँगकाँग या दोन्ही संघांची टी २०ळ क्रिकेटमध्ये आमनेसामने येण्याची ही दुसरी वेळ होती. याआधी दोन्ही संघ ११ वर्षांपूर्वी टी 20i वर्ल्ड कप २०१४ या स्पर्धेत भिडले होते. तेव्हा हाँगकाँगने बांगलादेशवर २ विकेट्सने विजय मिळवत मोठा अपसेट केला होता. बांगलादेशने विजय मिळवत त्या पराभवाची परतफेड केली.

हाँगकाँगचा या पराभवासह स्पर्धेतून पॅकअप झालं. हाँगकाँगचा हा या स्पर्धेतील एकूण आणि सलग दुसरा पराभव ठरला. हाँगकाँगचा या साखळी फेरीतील तिसरा आणि अंतिम सामना हा १५ सप्टेंबरला श्रीलंकेविरुद्ध होणार आहे.

# तालुका क्रीडा खो-खो स्पर्धेत गव्हाण विद्यालय सरस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे शासकीय पनवेल तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या १४ वर्षे खालील वयोगटातील मुलांच्या संघाने खो-खो या खेळाच्या स्पर्धेत अव्वल स्थान प्राप्त करून विजेतेपद प्राप्त केले.गतवर्षीच्या विजेत्या प्रतिस्पर्धी संघाला अंतिम फेरीत हरवून विजेता ठरलेल्या गव्हाण संघाने जिल्हास्तरावर धडक मारली. याच स्पर्धेत पहिल्या दिवशी १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने देखील अतिशय रोमहर्षक खेळी करून उपविजेतेपद पटकावले.याबद्दल या सर्व विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक होत आहे.

खो-खो १४ वर्षाखालील वयोगटात तालुका स्तरीय स्पर्धेत विजयी ठरलेल्या खेळाडू सोबत तालुका क्रीडा अधिकारी भक्ती तिवारी व इतर उपस्थित मान्यवरांनी छायाचित्रात सहभागी होवून अभिनंदन केले. या वेळी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक व पंच सुरेश पारखे व करूणा तांडेल उपस्थित होते.

विजयी संघाचे विद्यालयाचे आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजयशेठ घरत, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय उगले यांचेसह, पालक व पंचक्रोशीतील मान्यवरांनी हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# वुशू स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिका आयोजित रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर येथे झालेल्या १७ वर्षांखालील मुलांच्या वुशू स्पर्धेमध्ये नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील रोहन सुरेश वाजे याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याची मुंबई विभागीय शालेय वुशू स्पधसाठी निवड झाली आहे.

याशिवाय स्मित संदीप पाटील याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या दोन्ही विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुरूड तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने मुरूड तालुकास्तरीय पावसाळी शालेय क्रीडा स्पर्धा पिटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कॅरम, हॉलीबॉल आदी खेळांचे सामने रंगले.



स्पर्धेचे उद्घाटन पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव संजय रेडीज यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाला संस्थेचे अध्यक्ष खेळू वाजे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, ज्येष्ठ शिक्षक अकिल मुलाणी, क्रीडा समन्वयक पोपट कसबे, विनोद लाड, पंच अमित रेडीज, तजमूल तेटविलकर यांच्यासह तालुक्यातील विविध शाळांचे क्रीडा व्यवस्थापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक अरुण खुळपे यांनी, जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व असून आनंदी व उत्साही वातावरण निर्माण करण्यासाठी खेळामध्ये सक्रिय सहभाग आवश्यक आहे, असे सांगितले. विविध खेळांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

# नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या सहकार्याने नवी मुंबई महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशन येथे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धा झाली.



या स्पर्धेचा अनौपचारिक शुभारंभ ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव डॉ.हेमंत अनार्थे यांच्या हस्ते झाले. या वेळी क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा सदस्य धनंजय वनमाळी, ऐरोली स्पोर्ट्स असोसिएशनचे सदस्य राजीव साटम आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षाआतील मुले व मुली सहभागी झाले होते. नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातून मुलांच्या गटात ४६५ खेळाडू आणि मुलींच्या गटात ३४४ खेळाडू असे एकूण ८१९ खेळाडू सहभागी झालेले होते. गतवर्षीच्या तुलनेत यंदा स्पर्धेत मोठ्या संख्येने खेळाडूंचा वाढलेला उत्साही सहभाग दिसून आला.

मुलांच्या १४ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक वेदांत मांढरे आएइएस नवी मुंबई हायस्कूल वाशी, व्दितीय शिवराम कस्तुरी एपीजे स्कूल नेरूळ, तृतीय तन्मय पवार डॉ.डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल नेरुळ यांनी पटकाविला.

मुलांच्या १७ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक कौस्तव जैयस्वाल पोद्दार इंटरनॅशनल स्कुल (सीबीएसई) नेरुळ, व्दितीय रोहन तायडे आयसीएल कॉलेज वाशी, तृतीय हेम नंदा क्राईस्ट अकॅडमी स्कूल कोपरखैरणे यांनी संपादन केला.

मुलांच्या १९ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक सुयश पाटील सेंट झेवियर्स हायस्कूल नेरुळ, व्दितीय कपिल शेषवरे सेंट झेवियर्स हायस्कूल नेरुळ, तृतीय ऋषिकेश गव्हाणे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी यांनी पटकाविला.

मुलींच्या १४ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक सारा शेख आईइएस नवी मुंबई हायस्कूल वाशी, व्दितीय वीरा गोतारणे न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली, तृतीय सिया शेळके डॉ.डी.वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल नेरुळ यांनी मिळविला.

सर्व यशस्वी खेळाडू पुढील मुंबई विभागस्तरीय क्रीडा स्पर्धे साठी पात्र ठरलेले आहेत. प्रत्येक गटातील विजेत्या खेळाडूंना पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

# बॅडमिंटन आणखी वेगवान होणार

## 'बीडब्ल्यूएफ'ची २५ सेकंदांची 'टाईम-क्लॉक' प्रणाली लागू करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॅडमिंटन सामन्यांना अधिक वेग देण्यासाठी, खेळाची जागतिक नियामक संस्था 'बीडब्ल्यूएफ'ने (बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन) 'टाईम-क्लॉक' प्रणालीची चाचणी घेण्यास मान्यता दिली आहे. या प्रणालीनुसार, एका रॅलीनंतर खेळाडूंना पुढील रॅलीसाठी २५ सेकंदांत तयार व्हावे लागेल. २० नोव्हेंबरपासून निवडक वर्ल्ड टूर स्पर्धांमध्ये या नियमाची अंमलबजावणी सुरू होईल.

हे नियम २०२६ पर्यंत सुरू राहतील आणि त्यांचा अधिक विस्तृतपणे वापर केला जाईल. 'बीडब्ल्यूएफ'ने एका निवेदनात म्हटले आहे की, या नियमांमुळे 'बीडब्ल्यूएफ'ला 'टाईम-क्लॉक'ची चाचणी सुरू ठेवता येईल, ज्यात खेळाडूंना पुढील रॅलीसाठी २५ सेकंदांत तयार राहावे लागेल. या प्रणालीची चाचणी यशस्वी झाल्यानंतर राष्ट्रीय महासंघांना त्यांच्या खेळाडू,



प्रशिक्षक आणि कर्मचार्यांसोबत अंतर्गत चाचणी घेण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच, स्टेकहोल्डर्सकडून अभिप्राय घेण्यासाठी एक ऑनलाईन सर्वेक्षणही सुरू करण्यात आले आहे.

'बीडब्ल्यूएफ'ने अनेक सामन्यांच्या डेटाचे विश्लेषण केल्यानंतर हा २५ सेकंदांचा नियम निश्चित केला आहे. सामन्यांमध्ये कमीत कमी व्यत्यय आल्यास, रॅलीमधील सरासरी वेळ २२ सेकंद असतो, तर एका रॅलीची सरासरी वेळ नऊ सेकंद असते. 'बीडब्ल्यूएफ'चा विश्वास आहे की, २५ सेकंदांची ही मर्यादा खेळाडूंना आराम आणि खेळाचे सातत्य राखण्यासाठी योग्य संतुलन साधेल.

### नियमांचे तपशील

२५ सेकंदांची मर्यादा : प्रत्येक रॅलीनंतर खेळाडूंना २५ सेकंदांचा अवधी दिला जाईल. ही वेळ पंचांनी स्कोअर अपडेट केल्यावर सुरू होईल. सर्व्हर आणि रिसीव्हर : २५ सेकंदांच्या आत सर्व्हरने सर्व्हिससाठी तयार असणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे सर्व्हरने सर्व्हिससाठी स्थान घेतल्यावर रिसीव्हरनेही तयार असणे बंधनकारक आहे.

पंचांचे अधिकार : वैद्यकीय उपचार किंवा बॅडमिंटन कोर्टच्या देखभालीसारख्या विशेष परिस्थितीत पंचांना अधिक वेळ देण्याचा अधिकार असेल. खेळाडूंचे स्वातंत्र्य : खेळाडूंना टॉवेल घेणे, पाणी पिणे किंवा स्वतःवर कोल्ड स्प्रे वापरणे यांसारखे सामान्य क्रियाकलाप करण्यासाठी पंचांची परवानगी घेण्याची गरज नाही, जोपर्यंत ते २५ सेकंदांच्या आत सर्व्हिस/रिसीव्ह करण्यासाठी तयार असतील.

# प्राची सिन्हाला कराटेत सुवर्णपदक

**रोहा : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी. मोरे फाउंडेशन कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील प्राची मुकेश सिन्हा (बारावी विज्ञान) या विद्यार्थिनीने कोलकाता येथे आयोजित जेएफएसकेए ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२५ या अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेतील यशासह तिची वर्ल्ड कराटे चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६मधील रोहा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्राची सिन्हाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकाविला आणि शालेय क्रीडा स्पर्धेमध्येदेखील तिची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप पूर्वतयारीसाठी प्राचीने मास्टर मुकेश सिन्हा (शिवनेरी कराटे क्लास) यांच्याकडून मार्गदशन मिळविले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक आणि महाविद्यालय क्रीडा समितीच्या प्रमुख ऋतुजा पवार यांनी प्राची सिन्हाचे अभिनंदन केले आहे.

# ज्वाला गुट्टाकडून ३० लीटर ब्रेस्ट मिल्क दान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


भारताची स्टार बॅडमिंटनपटू ज्वाला गुट्टाने एक उपक्रम सुरु केलाय. हा उपक्रम खरच कौतुकास्पद आहे. नुकतीच आई बनलेली ज्वाला गुट्टा दररोज ६०० मिलीलीटर दूध सरकारी रुग्णालयांमध्ये दान करत आहे. बॅडमिंटन कोर्टवर देशासाठी अनेक मेडल जिंकणारी ज्वाला आता लहान निरागस बाळांचे प्राण वाचवत आहे.

ज्या नवजात बालकांना आई नाहीय, ज्वाला त्या बाळांच्या मदतीसाठी पुढे आली आहे. रिपोर्टसनुसार, तिने आतपापर्यंत ३० लीटर ब्रेस्ट मिल्क दान केलय. मागच्या चार महिन्यांपासून ज्वाला गुट्ट दररोज निरागस बाळांसाठी बरच काही करत आहे.

ज्वाला गुट्टा नुकतीच आई बनलीय. २२ एप्रिल २०२१ रोजी तिचं लग्न अभिनेता विष्णू विनोदसोबत झालं. चार वर्षानंतर ती आई बनली. ज्वाला आपल्या मुलीला दूध पाजल्यानंतर सर्व दूध दान करते. भारतात पहिल्यांदा कुठल्यातरी एथलीटने असं पाऊल उचललं आहे. हे खरच प्रेरणादायक आहे.

ज्वाला गुट्टाने आपल्या करिअरमध्ये बरच काही मिळवलय. तिने २०१० आणि २०१४ साली भारतासाठी कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकलं होतं.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com